बातम्या, लेख
व जाहिरातीसाठी
लातूर
समाचार
समर्थनगर धाराशिव
मो.९४२२४७२५०२
व ९१७२३२५७०८

| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक १५० वा | गुरूवार दिनांक २१ ऑगस्ट, २०२५ | पृष्ठे ६ | किंमत १.५० ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
(सांज दैनिक) पोष्ट परवाना
L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

dainiklatursamachar@gmail.com

प्रियंका
ढाबा हॉटेल
गड पाटी जवळ
धाराशिव.
रूचकर भोजनासाठी
भेट द्या

## गणेश विसर्जन मार्गाची जिल्हाधिकाऱ्यांनी केली पाहणी

## आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे दिले निर्देश



धाराशिव दि.२० ऑगस्ट (जिमाका) येत्या २७ ऑगस्ट रोजी गणरायाचे आगमन होणार आहे. धाराशिव शहरात विविध गणेश मंडळाकडून गणेश मूर्तीची विविध ठिकाणी स्थापना करण्यात येणार आहे.गणेश उत्सवादरम्यान आनंदाचे व भक्तिमय वातावरण राहणार आहे. गणेशोत्सवादरम्यान गणेश मंडळांना तसेच भाविकांना अडचणीचा सामना करण्याची वेळ येऊ नये,यासाठी संबंधित विभागांनी आतापासूनच नियोजन करून आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. असे निर्देश जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी संबंधित विभागांना दिले.

जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार व पोलीस अधीक्षक श्रीमती शफकत आमना यांनी आज धाराशिव शहरातील गणेश स्थापना व विसर्जन मार्गाची पाहणी केली. गणेश मूर्त्यांचे विसर्जन करण्यात येणाऱ्या हातलाई देवी मंदिर परिसरातील तलाव व समता चौकातील सार्वजनिक विहिरीला भेट देऊन पाहणी केली.यावेळी उपविभागीय अधिकारी ओंकार देशमुख, पोलीस उपअधीक्षक सुरेशकुमार राऊत, तहसीलदार डॉ.मृणाल जाधव,पोलीस निरीक्षक कुमार दराडे व संबंधित विभागाचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

श्री.पुजार म्हणाले की,विविध गणेश मंडळाकडून ज्या ज्या ठिकाणी गणरायाची स्थापना होणार आहे,त्या ठिकाणी गणेश मंडळाला कोणत्याही अडचणी येणार नाही याकडे लक्ष द्यावे.गणरायाची स्थापना होणाऱ्या ठिकाणी स्वच्छता असावी.गणेश मंडळांना व मिरवणुकीला अडथळा येणारे व अतिक्रमण केलेले असल्यास ते तातडीने हटविण्यात यावे.आवश्यक त्या ठिकाणी वाहन पार्किंगची व्यवस्था करण्यात यावी. त्यामुळे दर्शनाला येणाऱ्या भाविकांची गैरसोय होणार नाही व रस्त्यांमध्ये अडथळा येणार नाही याकडे लक्ष द्यावे.गणेश मंडळांनी पुरेशी प्रकाश व्यवस्था करावी. वीज वितरण विभागाने विद्युत तारा ह्या व्यवस्थित असल्याची खात्री करून आवश्यक त्या ठिकाणी दुरुस्ती करावी. गणेश मंडळांनी भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याची आणि कचरा टाकण्यासाठी कचरापेटीची व्यवस्था करावी.असे त्यांनी सांगितले.

ज्या मार्गाने गणेश विसर्जनाची मिरवणूक निघणार आहे त्या मार्गावरील खड्डे बुजवण्याची कामे तातडीने सुरू करावी असे सांगून श्री.पुजार म्हणाले की,विसर्जन मिरवणुकीला अडथळा ठरणारी रस्त्यावरील अतिक्रमणे तातडीने हटविण्यात यावी.चौका चौकात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था गणेश मंडळांनी तसेच सेवाभावी संस्थांनी करावी.मिरवणुकीमध्ये कोणीही मद्यप्राशन करून असणार नाही याकडे विशेष लक्ष द्यावे.हातलाई देवी मंदिर परिसरातील तलाव येथे गणेश मूर्तींचे विसर्जन होणार असल्यामुळे मोठ्या मूर्तींची विसर्जन करण्याची करण्यासाठी क्रेनची व्यवस्था करावी.पोलिसांनी मिरवणूक व विसर्जन ठिकाणी चोख बंदोबस्त ठेवावा. विसर्जन ठिकाणी घरगुती मूर्तींना एकत्र करून नगरपालिका व पोलीस विभागाने गणरायांचे विसर्जन करावे.तलावात जीवनरक्षक तैनात करावे.कोणालाही पाण्यात उतरू देऊ नये.कोणीही नशा करून पाण्यात उतरणार असेल तर त्याचा त्वरित बंदोबस्त करावा.असे ते म्हणाले.

विसर्जन ठिकाणी येणाऱ्या गणरायाच्या मूर्ती येण्याचा मार्ग व गणेश मंडळांना गणेश विसर्जन केल्यानंतर जाण्याचा मार्ग निश्चित करावा. निर्माल्य कोणीही तलावात टाकणार नाही,यासाठी तलाव व विहीर परिसरात कृत्रिम हौद तयार करावे,म्हणजे पूजेचे साहित्य व निर्माल्य एकाच ठिकाणी जमा करता येईल असे श्री पुजार यांनी यावेळी सांगितले.

गणेश विसर्जनासाठी ज्या मार्गाने गणरायाची मिरवणूक जाणार आहे,त्या छत्रपती शिवाजी महाराज चौक, बाबासाहेब आंबेडकर चौक,संत गाडगेबाबा चौक,जिल्हाधिकारी निवासस्थान,काळा मारुती चौक,लेडीज क्लब व बार्शी नाका जिजाऊ चौक तेथून पुढे बार्शी मार्गावरील हातलाई देवी तलाव आणि परत समता कॉलोनी या मार्गाची जिल्हाधिकारी श्री.पुजार व पोलीस अधीक्षक शफकत आमना यांनी पाहणी करून आवश्यक त्या सूचना संबंधित विभागाच्या उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिल्या.

## पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते ३७ प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये सोलार पॉवर पॅक व सोलार वॉटर यंत्रणांचे लोकार्पण

धाराशिव (जिमाका)- जिल्ह्यातील आरोग्य सेवांना शाश्वत ऊर्जेचा आधार देत नवा टप्पा गाठण्यात आला आहे.पालकमंत्री तथा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते ३७ प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये सोलार पॉवर पॅक व सोलार वॉटर यंत्रणांचे लोकार्पण तसेच असंसर्गजन्य रोग (NCD) क्लिनिकचे उदघाटन १५ ऑगस्ट रोजी ऑनलाईन पद्धतीने संपन्न झाले.

ओएनजीसी (ऑईल अँड नॅचरल गॅस कॉर्पोरेशन) कंपनीच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सीबिलिटी (CSR) अंतर्गत ९ प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये तर जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून २८ प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये सौर ऊर्जा व शुद्ध पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.यामुळे एकूण ३७ आरोग्य केंद्रांना सौर ऊर्जा व सुरक्षित पिण्याच्या पाण्याचा लाभ मिळणार आहे.ग्रामीण भागातील रुग्ण तसेच आरोग्य कर्मचारी यांना अखंडित वीजपुरवठा,स्वच्छ पाणी व पर्यावरणपूरक सुविधा यांचा थेट फायदा होणार आहे.या पायाभूत सुविधा आरोग्य व्यवस्थेतील कार्यक्षमता वाढविण्यास हातभार लावणार आहेत.

यावेळी मान्यवरांनी या उपक्रमाचे स्वागत करताना सौर ऊर्जेच्या वापरामुळे आरोग्य केंद्रांना मिळणाऱ्या शाश्वत उर्जेचा आणि स्वच्छ पाण्याच्या सुविधेचा सकारात्मक परिणाम ग्रामीण भागातील नागरिकांच्या आरोग्यावर होईल,असे प्रतिपादन केले.

दरम्यान,जिल्ह्यातील तुळजापूर व परांडा तालुक्यातील ५४ आरोग्य संस्थांमध्ये NCD क्लिनिक सुरू करण्यात आली आहेत.या क्लिनिकचे उद्घाटन १५ ऑगस्ट २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातून ऑनलाइन पद्धतीने पालकमंत्री यांच्या हस्ते झाले.या क्लिनिकमुळे नागरिकांना मधुमेह,उच्च रक्तदाब, हृदयविकार व कर्करोग यांसारख्या असंसर्गजन्य आजारांची तपासणी व निदान ग्रामपातळीवर उपलब्ध होणार आहे.ग्रामीण भागातील रुग्णांना वेळेवर उपचार मिळून त्यांचे आरोग्य सुधारण्यास मोठी मदत होणार आहे.

या कार्यक्रमाला आ. राणाजगजितसिंह पद्मसिंह पाटील, खा.ओमप्रकाश राजेनिंबाळकर, विधानपरिषद सदस्य आ.सतीश चव्हाण,आ.विक्रम काळे, विधानसभा सदस्य आ.कैलास घाडगे पाटील, आ.तानाजीराव सावंत व आ.प्रविण स्वामी आदी मान्यवर उपस्थित होते.तसेच जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार,मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष,जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.धनंजय चाकुरकर,जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतिश हरिदास व आरोग्य विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांचीही उपस्थिती होती.

या उपक्रमामुळे जिल्ह्यातील आरोग्य सेवा अधिक कार्यक्षम,तंत्रस्नेही व शाश्वत बनणार असून ग्रामीण भागातील नागरिकांना याचा थेट लाभ होणार आहे.

## क्राईम न्युज

### पाणबुडीमोटार व केबलची अनेक ठिकाणी केली चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव ग्रामीण पोलीस ठाणे फिर्यादी किसन शिवाजीराव देशमुख, वय ६५ वर्षे, रा. पोहनेर ता. जि. धाराशिव यांचे पोहनेर शिवारातील शेत गट नं ३५० मधील विहीरीवरील दोन ऑन्सन कंपनीच्या पानबुड्या, २५० फुट केबल, बाळासाहेब देशमुख यांचे दोन अून्सन कंपनीचे पानबुड्या व ६५ फुट केबल, विलास देशमुख यांची अजंटा कंपनीची पानबुडी, ५ फुट केबल, प्रकाश देशमुख यांची न्कर कंपनीची पानबुडी व ६० फुट केबल, बाळासाहेब देशमुख यांची न्सन कंपनीची पानबुडी व ९५ फुट केबल असा एकुण ६५,८५० किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने दि.१५.०८.२०२५ रोजी १९.३० ते दि. १६.०८.२०२५ रोजी ०६.३० वा. सु. अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला.अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-किसन देशमुख यांनी दि.१८.०८.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव ग्रामीण पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### हरभऱ्याच्या सत्तर कट्ट्याची अज्ञाताने केली चोरी

ढोकी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी मंगेश भारत मुळे, वय ३२ वर्षे,व्यवसाय वरद विनायक ग्रो फार्मर प्रोड्युसर कंपनी लि. रा.तांबरी विभाग धाराशिव ता. जि. धाराशिव यांचे किणी येथील शेतातील वरद विनायक ग्रो फार्मर प्रोड्युसर कंपनी लि. पत्राचे वेअर हाउस शेटरमधील ७० हराभऱ्याचे कट्टे अंदाजे २,१०,००० किंमतीचा माल हा दि. १६.०८.२०२५ रोजी अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी मंगेश मुळे यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन ढोकी पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## तुळजापूरमध्ये उभारण्यात येणाऱ्या १०८ फूट उंचीच्या भव्य शिल्पासाठी फायबर मॉडेल सादरीकरणाला मुदतवाढ

धाराशिव (जिमाका) श्री तुळजाभवानी तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत तुळजापूर येथे १०८ फूट उंचीचे भव्य ब्राँझ धातूचे शिल्प उभारण्यात येणार आहे.हे शिल्प छत्रपती शिवाजी महाराजांना श्री तुळजाभवानी देवी आशीर्वाद देत असलेल्या ऐतिहासिक प्रसंगावर आधारित असणार आहे.

या शिल्पाच्या मूळ आराखड्यासाठी महाराष्ट्र राज्याच्या कला संचालनालयाच्या मार्गदर्शनाखाली २.५ ते ३ फूट उंचीच्या फायबर मॉडेल्स मागविण्यात आली आहेत. हे मॉडेल्स तयार करण्यासाठी इच्छुक शिल्पकारांकडे शिल्पकलेतील पदवी अथवा पदविका तसेच किमान १५ वर्षांचा व्यावसायिक अनुभव असणे आवश्यक आहे.

तयार झालेल्या फायबर मॉडेल्सपैकी निवड समितीद्वारे एकूण ५ मॉडेल्सची निवड करण्यात येईल. निवड झालेल्या प्रत्येक मॉडेल सादरकर्त्याला १.५ लाख रुपये मानधन दिले जाईल,तर अंतिम निवड झालेल्या मॉडेल सादरकर्त्याला १० लाख रुपयांचे मानधन देण्यात येणार आहे.

हे मॉडेल्स तयार करताना इतिहास व धार्मिक संदर्भांचा विचार करणे बंधनकारक असून,त्यासाठी शिल्पकारांनी इतिहासकार तसेच पुरातत्व विभागाने उपलब्ध करून दिलेले संदर्भ अभ्यासणे आवश्यक आहे.

**मुदतवाढ – शिल्पकारांसाठी दिलासा**

मूळत: फायबर मॉडेल्स सादर करण्याची अंतिम तारीख १ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट २०२५ अशी होती. मात्र,शिल्पकारांच्या सोयीसाठी आणि अधिक गुणवत्तापूर्ण मॉडेल्स सादर व्हावीत या उद्देशाने या कालावधीस वाढ देऊन अंतिम तारीख १५ सप्टेंबर २०२५ निश्चित करण्यात आली आहे.

सदर फायबर मॉडेल्स कला संचालक,कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांच्याकडे सादर करावयाची आहेत.या संपूर्ण प्रक्रियेचे सर्व अधिकार जिल्हाधिकारी, धाराशिव तसेच अध्यक्ष श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर यांच्याकडे राहतील.

या उपक्रमासंदर्भातील अधिक माहिती व मार्गदर्शक सूचना खालील संकेतस्थळांवर उपलब्ध आहेत https://dharashiv.maharashtra.gov.in https://shrituljabhavani.org श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्यावतीने कलारसिक शिल्पकारांनी या ऐतिहासिक संधीचा लाभ घ्यावा,असे आवाहन करण्यात आले आहे.

## धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालयासमोर कंत्राटदारांचे धरणे आंदोलन; आठ महिन्यांपासून देयके थकित, विकासकामे ठप्प



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- महाराष्ट्रातील सार्वजनिक बांधकाम विभाग, जलजीवन मिशन, ग्रामीण पाणीपुरवठा, ग्रामविकास विभाग, जलसंपदा, जलसंधारण आदी विविध विभागांतर्गत सुरू असलेली शासनाची विकासकामे गेल्या आठ महिन्यांपासून ठप्प झाली आहेत. कारण, या विभागांतील कंत्राटदारांना शासनाकडून एक पैसाही मिळालेला नाही.

देयके न मिळाल्याने कामकाज अडचणीत आले असून विना-दंड मुदतवाढही मंजूर केली जात नाही. परिणामी, कंत्राटदारांची अनामत रक्कम, अतिरिक्त खर्च तसेच इतर थकबाकी अडकून पडली आहे. अनेकांनी कामच बंद केले असून, प्रशासनाकडून दबाव टाकून काम सुरू ठेवण्यास भाग पाडले जात असल्याचा आरोप संघटनांनी केला आहे. त्यामुळे कंत्राटदार आर्थिक व मानसिकदृष्ट्या आत्महत्येस प्रवृत्त होण्याच्या स्थितीत पोहोचले असल्याची गंभीर भावना त्यांनी व्यक्त केली.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ, बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया, राज्य अभियंता संघटना, महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा कंत्राटदार संघटना, राज्य हॉट मिक्स असोसिएशन, राज्य मजूर सहकारी फेडरेशन आदी प्रमुख संघटनांनी वेळोवेळी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच संबंधित मंत्र्यांना निवेदने दिली आहेत. तसेच, मुख्यमंत्री स्तरावर संबंधित मंत्री, वरिष्ठ प्रशासकीय सचिव व अधिकारी यांच्यासोबत बैठक घेण्याची मागणीही करण्यात आली आहे. मात्र, शासनाकडून ठोस पावले न उचलल्याने संघटनांमध्ये तीव्र नाराजी आहे.

दरम्यान, थकबाकी देयके व ठप्प कामांच्या निषेधार्थ धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालयासमोर कंत्राटदारांनी धरणे आंदोलन केले. नवीन विकासात्मक कामांना मंजुरी न देणे आणि विद्यमान कामांसाठी निधी उपलब्ध न करणे यामुळे राज्यातील अभियंता, कंत्राटदार, मजूर संस्था, वाहतूकदार, माल सप्लायर्स, रोजंदारी कामगार, तसेच या व्यवसायावर अवलंबून असलेला शिक्षित वर्ग अशा जवळपास पाच कोटी लोकांचा रोजगार व चरितार्थ धोक्यात आल्याचा आरोप करण्यात आला.

या धरणे आंदोलनात धाराशिव कंत्राटदार संघटनेचे अध्यक्ष सज्जनराव साळुंके, रामराजे पाटील,के. डी.घोडके, व्यंकटेश मोटे, अमोल गरड, सुनील माने, मधुकर मोटे, ए.जी. गरड,भारत इंगळे, सुनील चव्हाण, संदिप ठोंबरे,वैभव गपाट, विशाल वडणे, निलेश शिंदे, दत्ता देशमुख, तात्याराव सावंत, संजय जेवळीकर यांच्यासह अनेक कंत्राटदारांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

## मेडशिंगा गावचा सुपुत्र धीरज जाधव जलसंपदा विभागात अधिकारी: नागरी सत्कार करून करण्यात आला गौरव



धाराशिव (प्रतिनिधी)- मेडसिंगा गावचा सुपुत्र धीरज ज्ञानोबा जाधव याची सरळ सेवेमधून जलसंपदा विभागाअंतर्गत राहुरी येथील पाटबंधारे विभागात स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (उर्ळीळश्र एपसळपशशीळपस -ीळीींरपीं) या पदावर निवड झाली आहे. त्यांच्या या यशाबद्दल गावकऱ्यांमध्ये व मित्रपरिवारामध्ये आनंदाचे वातावरण असून, त्यांच्या सन्मानार्थ नुकताच भव्य नागरी सत्काराचा कार्यक्रम पार पडला.

हा सत्कार सोहळा श्री व सौ. मंगल बलभीम कदम व पुष्पक गृह निर्माण सोसायटी, बालाजी नगर (शेकापूर रोड) येथील ग्रामस्थांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. ज्येष्ठ नागरिकांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांनी धीरज जाधव यांच्या गळ्यात पुष्पहार घालून, शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सन्मान केला. उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून धीरज यांच्या यशाचे कौतुक करत भावी सेवेसाठी शुभेच्छा दिल्या.

आपल्या मनोगतात धीरज जाधव म्हणाले, हा यशाचा प्रवास माझ्या आई-वडिलांच्या आशीर्वादामुळे, कुटुंबीयांच्या पाठिंब्यामुळे आणि मित्रपरिवाराच्या प्रोत्साहनामुळे शक्य झाला आहे. आता शासनाच्या सेवेत राहून प्रामाणिकपणे जबाबदारी पार पाडण्याचा माझा संकल्प आहे.

कार्यक्रमाला बालाजी नगर परिसरातील नागरिक, मित्रपरिवार व जाधव कुटुंबाचे नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन अभिषेक तुकाराम जाधव यांनी केले तर आभार प्रदर्शन मित्रपरिवाराच्यावतीने करण्यात आले.

याच कार्यक्रमात गावातील प्राथमिक शिक्षक श्री. खिल्लारे मधुकर रंगनाथ व माध्यमिक शिक्षक श्री. दत्तात्रय भीमराव आगळे यांचा वयोमानानुसार सेवानिवृत्तीनिमित्त जाधव बंधू ज्ञानोबा व तुकाराम यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

धाराशिव जिल्ह्यातील युवकांनी मेहनत व चिकाटीच्या जोरावर राज्यसेवेत स्थान मिळविले, हा अभिमान व्यक्त करत सर्वत्र या नागरी सत्काराची चर्चा होत आहे. या सोहळ्यातून नवयुवकांना प्रेरणा मिळून तेही शिक्षण व परिश्रमाच्या जोरावर मोठ्या पदावर भरारी घेतील, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

## जुगार अड्ड्यावर पोलीसांचा छापा

धाराशिव (प्रतिनिधी)- पोलीस अधीक्षक, धाराशिव श्रीमती शफकत आमना यांना गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, नॅशनल हायवे ५२ जवळील भवानी चौक ते अहिल्यादेवी होळकर चौकाकडे जाणारे रोडलगत असलेल्या गाझी हॉटेलच्या बाजूला पत्राचे शेडमध्ये धाराशिव येथे काही इसम तिरट मटका नावाचे जुगार खेळत व खेळवीत आहे असे इसमांची खात्रीशीर माहिती मिळाल्याने त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही कराणे बाबत आदेशीत केल्याने पोलीस अधीक्षक कार्यालयाचे वाचक हिंगोले, पोलीस हावलदार तांबे, शेख, लोखंडे, भोजगुडे व सोबत क्यु.आर.टी. पथक यांचे पथकाने नमुद ठिकाणी जावून २०.२० वा. सु. छापा टाकला असता तेथे काही इसम गोलाकार बसून तिरट मटका नावाचे जुगार खेळत असतांना मिळून आले. १.सर्फराज, २.जुबे, ३.श्रीकांत, ४.पाशा, ५.अजमतुल्ला ६.अमो , ७.अमीर ,८.सागर मारुती भांडवले,९.आबेद , १०.रविंद्र सर्व रा. धाराशिव हे सर्व लोक तिरट मटका जुगार खेळत असताना पथकास मिळुन आले. नमुद इसम हे रोख रक्कम सह मोबाईल फोन, वाहने व जुगाराचे साहित्यासह असा एकुण १०,५८,१८५ स्वत:चे कब्जात बाळगलेले असताना पथकास मिळून आले. यावरुन नमूद व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र जुगार कायदा कलम- ४,५ अन्वये धाराशिव शहर पो. ठा. येथे गुन्हा नोंदवला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

ओ३म् भूर्भुव: स्व: ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो न: प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## पावसाने झाले मोठे नुकसान

राज्यात अचानक कोसळलेला पाऊस व ढगफुटीसारख्या घटनेमुळे मोठे नुकसान कोणाचे झाले असेल तर ते शेतकऱ्याचे झाले आहे. शेतजमीन बऱ्याच प्रमाणात नष्ट झाली. एकतर शेतीतील उभे पिक आडवे झाले व शेतामधील मातीच वाहुन गेली आहे. राज्यातील दुहेरी संकट शेतकऱ्यावर आले आहे. आता तर मोठे सण आहेत. गणपती, लक्ष्मी गौरी, पोळा, दसरा व दिवाळी असे मोठे सण शेतकरी साजरा करतात. घरोघरी हा उत्सव साजरा होत असतो. राज्यात शेती करणारे अधिक संख्येने नागरिक आहेत. मुंबईतील असंख्य कोकणी बांधव कोकणात जातात. गौरी व गणपती हा सण साजरा करतात. त्यामुळे अचानक नैसर्गिक उद्भवलेल्या संकटावर मात करणे आवघड दिसून येत आहे. पावसाच्यापाण्यामुळे नदी, नाले, पाटबंधारे आदि भरून वाहात आहेत. एवढा अधिक पाऊस होईल असे कोणालाही वाटत नव्हते. एक तर शेतीत आलेले पिक हाताचे गेले आहे. राज्यात मोठ्या प्रमाणात सोयाबिन पेरले आहे. काही ठिकाणी ऊस आहे. ऊस कसातरी तग धरू शकतो. मात्र सोयाबिन तग धरू शकत नाही. अतिषय नाजूक पिक आहे हे मान्यच केले पाहिजे. मुळात राज्यातील शेतकरी हा आर्थिकदृष्टया कमकुवत आहे. त्यात नैसर्गिक संकटामुळे आडचणीत सापडला आहे. अजून पंचनामे नाहीत. मुळात पंचनामे ही पद्धत तशी जुनी आहे. ठराविक नेमलेले अधिकारी कर्मचारी दुर्घटना स्थळास भेट देणे व जायजा घेणे! ही पद्धत जुनी आहे. आता सॅटेलाईटच्यामाध्यमातून सर्व बाबी कळतात. ड्रोनची मदत घेतली तर अंदाज येतो. अनेक विज्ञानाने प्रगती केली आहे. त्यानुसार झालेल्या नुकसानीचा अंदाज घेतला जाऊ शकतो. नुकसान झालेल्या ठिकाणी जाऊन माहिती घेण्यापेक्षा विविध यंत्रणेचा उपयोग करून माहिती घेता येते. तरी पंचनामे करा असे म्हटले जाते. एक बाब लक्षात घेतली पाहिजे. नुकसान झाले आहे. हे मान्यच असेल तर किती नुकसान झाले याचा अंदाज येतो त्यानुसार ऑनलाईन मदत खात्यात जमा करता येते. पुर्वी सारखी परिस्थिती आता राहीली नाही. तातडीने माहिती घेता येऊ शकते. त्यामुळे राज्य सरकारने पंचनामे आदि बाबत चौकशीत न आडकता जे लक्षात येते. जे यंत्रणेस माहिती झाले आहे त्यानुसार मदतीची सध्याला गरज आहे. राज्यात काही ग्रामीण भागात मोठे नुकसान झाले आहे असे महसुल यंत्रणेद्वारे सरकारला समजले असेल. त्यानुसार मदतीसाठी हालचाली दिसून आल्या पाहिजेत. पावसाने मोठा कहर केला आहे. पिण्याचा पाण्याचा प्रश्न सुटला असला तरी शेतीचे नुकसान झाले त्याचे काय? त्याच प्रमाणे शेतकऱ्याचे डबल नुकसान झाले आहे. एक उभ्या पिकाचे व दुसरे जमीनीतील माती वाहुन गेली आहे. असे दुहेरी संकटावर मदतीशिवाय मात करणे अशक्य आहे. वास्तविक अनेक भागात शेतीचे नुकसान झाले हे मान्य असेल तर मदतीसाठी विलंब लावणे योग्य नाही. मदत ही केली पाहिजे. ते करणार यात शंका नसली तरी सणाचे दिवस असल्याने दिली जाणारी विलंबाने मदत तीच जर तातडीने मिळाली तर समाधानची बाब आहे. आता रब्बीच्या पिकासाठी राण तयार करणे अतिषय आवघड काम आहे. कारण शेतीतील माती बऱ्याच ठिकाणी वाहुन गेली आहे. माती शिवाय पीक येत नाहीत ही बाब सर्वांना माहिती आहे. राज्यातील बहुसंख्य नागरिकांचा व्यवसाय शेती आहे. शेतीचे नैसर्गिक संकटाने नुकसान झाले तर ती तातडीने भरून न येणारी बाब आहे. त्यासाठी विलंब लागेल. त्यापुर्वी मोठे सण असल्याने आर्थिक मदतीची मोठी गरज आहे. सध्याला ग्रामीण भागात सुधारणा झाल्याने पक्के घरे बऱ्या प्रमाणात असल्याने घराची पडझड झाली नाही. जे सरकारी काम होते. जसे शाळा आदि सरकारच्यावतीने बांधकामची मात्र बऱ्याच प्रमाणात वाट लागली आहे. वीज अनेक ठिकाणी खंडीत झाली आहे. पोल, तारा बरोबर डीपीच पडल्याच्या घटना समोर आल्या आहेत. एवढे तकलादू काम होते हा जणू पावसाने पुरावाच दिला आहे. राज्यात सर्वाधिक नुकसान व्यापारी, उद्योगपती किंवा इतर कोणाचे झाले नाही तर केवळ शेतकऱ्याचे झाले आहे. ही सर्वात मोठी बाब आहे. त्यात सर्वाधिक आर्थिक विवंचनेमुळे जीवन संपविणाऱ्यामध्ये कोण दिसून येतात तर शेतकरी हे मान्यच केले पाहिजे. त्यामुळे सरकारने आता शेतकऱ्यास तातडीने मदतीची गरज आहे. मुळात बंगालच्या उपसागरातील कमी दाबाच्या क्षेत्रामुळे राज्यात मान्सून प्रवाह तीव्र झाला. कोकण, मध्य महाराष्ट्र व मराठवाड्यात मुसळधार ते अति-मुसळधार पावसाच्या सरी कोसळल्या जात आहेत. राज्यभरात पावसाशी संबंधित अपघातांमुळे किमान २१ ते २४ मृत्यूंची नोंद झाली आहे. सततच्या मुसळधार पावसाने रस्ते-रेल्वे वाहतुकीत व्यत्यय; अनेक लोकल गाड्या उशिरा/रद्द, काही उड्डाणे विलंबीत. बीएमसीने १९ ऑगस्ट रोजी शाळा-महाविद्यालयांना सुट्टी जाहीर केली होती. गोरेगाव, अंधेरी, कुर्ला, विक्रोळी परिसरात तीव्र पाणी साचल्याची नोंद आहे. कोकण व पश्चिम रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, पालघर, ठाणे, कोल्हापूर परिसरात नदीपात्रे खच्चून भरली असून जगबुडी, वशिष्ठी, शास्त्री, अंबा, उल्हास इ. नद्यांचे पाणी वाढले. गगनबावडा (कोल्हापूर) २६० मिमी, राधानगरी २२० मिमी, महाबळेश्वर १७० मिमी पाऊस नोंद झाली आहे. नांदेड, लातूर, बीड, हिंगोली, धाराशिव जिल्ह्यांमध्ये ढगफुटी/अतिवृष्टीच्या घटना दिसून आल्या तर नांदेडातील मुखेड तालुक्यातील ढगफुटीत मृत्यू व मोठी हानी. राज्यात गेल्या दोन-तीन दिवसांत मृत्यूंच्या नोंदीत मराठवाड्याचा वाटा जास्त आहे. मानवी हानी व लोकवस्त्यांवरील परिणाम झाला असून मृत्यू/बेपत्ताचे प्रमाण पाहिले तर राज्यात किमान २१-२४ मृत्यूंची नोंद झाली आहे. काही जिल्ह्यांत बेपत्ता प्रकरणे. शेवटच्या २४ तासांत ६ मृत्यूंची नोंद, तर नांदेडमध्ये काहीजण बेपत्ता असल्याचे राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून कळवले. मराठवाड्यात ५६१ कच्ची घरे बाधित असून २१ पक्की घरे आंशिक, तर २ घरे पूर्णतः कोसळल्याची नोंद झाली आहे. त्यामुळे सर्व अंदाज घेतला तर शेतकऱ्यास तातडीने मदतीची गरज आहे. पंचनामे व अंदाज घेत बसला तर सणासुदीच्या काळात ते योग्य ठरणारे नाही.

# पावसाळ्यात वादळी वाऱ्यात वीजेच्या तारा तुटल्यास स्पर्श करू नका, सावधगिरी बाळगा महावितरणचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** पावसाळा आणि वादळी वाऱ्याच्या दिवसांत वीजेच्या तारा व पोल तुटून पडण्याच्या घटना वाढतात. अशा वेळी नागरिकांनी वीज यंत्रणेपासून सुरक्षित अंतर राखावे, कोणतीही तुटलेली वीजतार किंवा पोलला स्पर्श करू नये, अशी सूचना महावितरणने केली आहे.

पावसाळ्यात व वादळी वाऱ्यात वीजेचे खांब, तारा तुटून शेतात, रस्त्यावर किंवा घराजवळ पडल्यास त्या ठिकाणापासून लांब राहावे. यामध्ये वीजप्रवाह सुरू असण्याची शक्यता असल्याने अशा तारा किंवा पोलला हात लावणे जीवघेणे ठरू शकते. त्वरित महावितरणच्या जवळच्या कार्यालयाशी संपर्क साधावा, किंवा टोल फ्री क्रमांकावर माहिती द्यावी.''

महावितरणकडून नागरिकांच्या सुरक्षेसाठी सतर्कता बाळगली जात असून, आपत्कालीन परिस्थितीत तातडीने मदत पुरवली जाते. नागरिकांनी कोणतीही दुर्घटना टाळण्यासाठी वीज यंत्रणेशी संबंधित खबरदारी घ्यावी, असेही महावितरणने सांगितले.

**महावितरण आपत्कालीन संपर्क क्रमांक: टोल फ्री १९१२**

लातूर जिल्ह्यासाठी कंट्रोलरूमच्या ७८७५७६२०२१ या क्रमांकावर त्वरीत कळवावे. या क्रमांकावर व्हॉटसअप सुविधाही उपलब्ध तरून देण्यात आलेली आहे.

**पावसाळ्यात वीजेच्या यंत्रणेपासून सुरक्षित राहण्यासाठी खालील उपाययोजना कराव्यात:**

विजांचा कडकडाट होत असेल तर सर्व विद्युत उपकरणे बंद करून मुख्य वीज कनेक्शनपासून वेगळे करावे.

घरातील अर्थिंग नीट आणि सुस्थितीत ठेवावी, गरजेनुसार तपासणी करावी.



जमिनीवर तुटलेल्या किंवा लोंबकळणाऱ्या वीजतारांना स्पर्श करू नये, त्वरित महावितरणाला माहिती द्यावी.

कपडे वाळविण्यासाठी किंवा इतर वापरासाठी लोखंडी तारांचा वापर टाळावा, कारण त्या वीजतारांच्या संपर्कात आल्यास अपघात होऊ शकतो.

घरातील स्वीचबोर्ड, फ्यूज बॉक्स आणि विद्युत उपकरणे पाण्यापासून सुरक्षित ठेवावीत, ओले हातांनी उपकरणे हाताळू नयेत.

विजेच्या उपकरणांवर पावसाचे पाणी नजरेत येताच त्वरित ते बंद करावे आणि प्लग काढून ठेवावे.

घरातील दूरचित्रवाणी डिश व अँटेना वीजतारांपासून दूर ठेवावेत.

विजा चमकताना घराबाहेर न पडता, विद्युत उपकरणे वापरणे टाळावे, धातूच्या वस्तूंपासून दूर राहावे.

वीजतार किंवा पोल तुटल्यास किंवा पडल्यास त्याजवळ जाऊ नये, त्वरित संबंधित वीज कार्यालयाला कळवावे.

पावसाळ्यात झाडे, फांद्या कोसळल्यामुळे तुटलेल्या तारांकडे विशेष लक्ष द्यावे आणि सुरक्षित अंतर ठेवावे.

या उपाययोजनांमुळे पावसाळ्यात विद्युत अपघात टाळता येऊ शकतात आणि सुरक्षितता वाढते

## प्रजापिता ब्रम्हाकुमारी राजयोग केंद्राच्यावतीने माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांना निमंत्रण



**लातूर/प्रतिनिधी :** प्रजापती ब्रम्हाकुमारी राजयोग केंद्राच्या वतीने लातूर येथे होणाऱ्या रक्तदान शिबिरासाठी केंद्राच्या वतीने माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब यांच्या आशियाना निवासस्थानी केंद्राच्या संचालिका ब्रम्हा कुमारी नंदा दीदी व केंद्राच्या उपसंचालिका ब्रम्हा कुमारी पुण्या दिदी व रोटरी क्लबचे रविशंकर हिंगने यांनी भेट घेवुन आयोजीत करण्यात आलेल्या २२,२३ ऑगस्ट रोजी लातूर शहरात रक्तदान शिबिरासाठी उद्घाटक म्हणून उपस्थित राहावे अशी विनंती केली आहे तसेच यावेळी रक्षाबंधन निमित्ताने राजयोग केंद्राच्या वतीने माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब यांना राखी बांधण्यात आली.

यावेळी लातूर केंद्राच्या संचालिका ब्रम्हा कुमारी नंदा दिदी यांनी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांना केंद्राच्या वतीने विविध चालु असलेल्या कार्यक्रमांची माहिती दिली.

## दयानंद विज्ञान महाविद्यालयात सद्भावना दिनानिमित्त शपथ



**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.२० ऑगस्ट २०२५ रोजी भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांचा जन्मदिवस सद्भावना दिवस म्हणून साजरा करण्यात आला.यावेळी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी भारतरत्न राजीव गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले आणि त्यांच्यासमवेत सर्वांनी सद्भावना दिनाची शपथ घेतली.

याप्रसंगी पर्यवेक्षक डॉ. हेमंत वरूडकर, पर्यवेक्षिका डॉ.संध्या कोल्हे-वाडीकर, कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव, प्रा.अनिलकुमार माळी, प्रा.बळवंत सूर्यवंशी, ग्रंथपाल प्रा.किरण भिसे, प्रा.कविता जाधव, डॉ.कोमल गोमारे, प्रा.व्यंकट कैले, प्रा.जीवन जाधव, सुदाम सातपुते, विनोद घार, किशोर जाधव, दिलीप राठोड, मोहसीन शेख, विष्णू नाईकवाडे, सतीश तांदळे, नितेश दुधभाते, श्रावण माळी, बाबासाहेब बचाटे, हक्कानी शेख,पवार, सुदर्शन काळे यांच्यासह इतर प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांची पूरग्रस्त गावांना भेट

**नुकसानीचे पंचनामे, उपाययोजनांचा घेतला आढावा**



**लातूर/प्रतिनिधी :** जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज उदगीर तालुक्यातील पूरग्रस्त मौजे बोरगाव बुद्रुक, धडकनाळ आणि टाकळी या गावांना भेट देऊन पूरग्रस्त भागातील शेती, घरांचे नुकसान आणि इतर बाधित क्षेत्रांची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी प्रशासनाची बैठक घेऊन पंचनामे, उपाययोजना आणि नागरिकांच्या आरोग्य सुविधांबाबत आढावा घेतला.

जिल्हाधिकाऱ्यांनी बोरगाव येथील तानाजी धोंडीबा सुभाने, हनुमंत अर्जुन सुभाने आणि रमेश अर्जुन सुभाने यांच्या घरांना भेट देऊन पाहणी केली, जिथे तीन ते चार फूट पाणी साचले होते. त्यांनी गावकऱ्यांना प्रशासनाच्या सर्व उपाययोजनांची माहिती देऊन आश्वस्त केले. पीक नुकसानी, मृत जनावरे, पडझड झालेली घरे आणि इतर नुकसानीचे पंचनामे तातडीने पूर्ण करून पात्र लाभार्थ्यांना सानुग्रह अनुदान त्वरित वितरित करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

बोरगाव आणि धडकनाळ गावातील विद्युत पुरवठा आजच सुरळीत करण्याच्या सूचना देतानाच, गावात अस्वच्छतेमुळे रोगराई पसरणार नाही यासाठी आवश्यक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी दिल्या. विविध सेवाभावी संस्था आणि व्यक्तींनी पूरग्रस्तांना केलेल्या मदतीचे त्यांनी कौतुक केले.

यावेळी उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे, तहसीलदार राम बोरगावकर, महावितरणचे मुख्य अभियंता अरविंद बुलबुले, अधीक्षक अभियंता प्रशांत दाणी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी शिंदे, गट विकास अधिकारी प्रवीण सुरडकर, उपविभागीय कृषी अधिकारी श्री. यादव, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. श्रीधर शिंदे यांच्यासह तालुका कृषी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## लातूर शहर महानगरपालिका कर्मचारी गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी बालाजी काशिनाथ शिंदे भांडारपाल यांची निवड

**लातूर/प्रतिनिधी :**

१९ ऑगस्ट रोजी लातूर शहर महानगरपालिका कर्मचारी गणेश मंडळाची बैठक गणेश चौधरी अग्निशमन अधिकारी यांच्या अध्यक्षखाली आयोजित करण्यांत आली होती. सदर बैठकीस रवि कांबळे, शुभम बावणे, पवन सुरवसे, असलम शेख, दिपक पवार, व्यंकट हिरास, पंडीत पवार, बालाजी गायकवाड, अगंद शिंदे, अभिषेक माळवे, ईश्वर घोलप, भाग्यवंत पवार, मनोज लोखंडे, सय्यद बाबू, कैलास भगनुरे, नवनाथ लोखंडे, महेश शर्मा इत्यादी कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

सदरील बैठकीत सर्वानुमते श्री बालाजी काशिनाथ शिंदे, भांडारपाल यांची अध्यक्ष म्हणून निवड करण्यांत आली.



तर उपाध्यक्ष- धोंडीबा सोनवणे, पंडीत लोहारे, राधीका गडदे सचिव श्री गणेश चौधरी, सहसचिव - कैलास मुद्दे, रोहीत पवार, अनुराधा देवकते, छाया आकाडे कोषाध्यक्ष- चंद्रकांत बावगे, मिरवणूक प्रमुख व्यंकट हिरास, संतोष ठाकूर, पवन सुरवसे संघटक- पंडीत पवार, रणदावणी पवार, संजय महापूरे भोजन प्रमुख- महेश शर्मा, हणमंत जाधव, जगन्नाथ पवार, शाम तापकिरे सल्लागार रमाकांत पिडगे, कलीम शेख, नंदकिशोर तावडे, खदीर शेख, बंटी राजूरे, समाधान सुर्यवंशी, बंडू किसवे, संतोष लाडलापूरे, अभिमन्यू पाटील व रुमानंद वडगावे, जरीचंद तापकीर यांची निवड करण्यांत आली तर बैठकीचे आभार प्रदर्शन दिपक पवार यांनी करुन बैठक खेळीमेळीत संपन्न झाली.

## मुख्यमंत्री सहायता निधीतून लातूर जिल्ह्यातील रुग्णांना ४ कोटी ४० लाखांची मदत

राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरीब रुग्णांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष हा मोठा आधार बनला आहे. विशेषतः लातूर जिल्ह्यात जानेवारी ते जुलै २०२५ या अवघ्या सात महिन्यांत ५४५ रुग्णांना ४ कोटी ४० लाख ७९ हजार रुपयांची वैद्यकीय मदत करण्यात आली आहे. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून जिल्हास्तरावर सुरु करण्यात आलेल्या मुख्यमंत्री सहायता निधी कक्षातून अवघ्या तीन महिन्यात १५८ जणांना मदतीचा हात मिळाला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून नागरिकांचा विचार करून जिल्हा कक्ष स्थापन करण्यात आले. त्यातून लाभार्थी नागरिकांची संख्या वाढली. त्यासोबतच आरोग्य शिबिर व रक्तसंकलन आदी उपक्रम प्रभावीपणे राबविणे सहज शक्य होत आहे, असे मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले.




लातूर जिल्ह्यात जानेवारीमध्ये ५८, फेब्रुवारीमध्ये ७१, मार्च ६६, एप्रिलमध्ये ६३, मेमध्ये ७१, जूनमध्ये ९१ आणि जुलैमध्ये ७७ आणि ऑगस्ट महिन्यात १५ तारखेपर्यंत ४८ अशा एकूण ५४५ रुग्णांना सुमारे ४ कोटी ४० लक्ष ७९ हजार रुपये मदत मिळाली आहे.

**२० गंभीर आजारांकरिता मिळते मदत**

मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या माध्यमातून २० गंभीर आजारांवरील उपचारासाठी मदत केली जाते. यामध्ये कॉक्लियर इम्प्लांट, हृदयविकार, किडनी, लिव्हर, बोन मॅरो प्रत्यारोपण, कर्करोग, अपघात, नवजात बालकांचे आजार, मेंदू विकार, डायालिसिस, भाजलेले रुग्ण, विद्युत अपघात आदींचा समावेश आहे.

**जिल्हा कक्षाच्या माध्यमातून मदत**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार प्रत्येक जिल्ह्यात मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. ज्यामुळे रुग्णांना मदत मिळविण्यासाठी मंत्रालयात जाण्याची गरज भासत नाही. रुग्णांनी प्रथम महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना, आयुष्मान भारत, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम, किंवा धर्मादाय रुग्णालयांच्या योजनांचा लाभ घ्यावा. जर या योजनांद्वारे उपचार शक्य नसतील, तर, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाकडे संलग्न असणाऱ्या रुग्णालयातून अर्ज करता येतो. यामुळे शासकीय योजनांचा सुयोग्य वापर होतो आणि निधीचा उपयोग खऱ्या गरजू रुग्णांपर्यंत पोहोचतो.

**मुख्यमंत्री सहायता निधीतून मदत मिळविण्यासाठी आवश्यक कागदपत्रे**

आधार कार्ड, रेशन कार्ड, उत्पन्नाचे प्रमाणपत्र (१.६० लाखांपेक्षा कमी), वैद्यकीय खर्चाचे प्रमाणपत्र, रुग्णालयाची नोंद मुख्यमंत्री सहाय्यता निधी कार्यालयाच्या संगणक प्रणालीवर असावी, अपघात असल्यास एफआयआर किंवा एमएलसी, अवयव प्रत्यारोपण असल्यास झेडटीसीसी नोंदणी पावती आवश्यक आहेत.

– जिल्हा माहिती कार्यालय, लातूर

## नेमके काय आहे 'कीटो डायट'?

वजन घटविण्यासाठी लोक डायटिंग, म्हणजेच आहार पद्धतीमध्ये बदल करण्याचा पर्याय निवडतात. हे योग्यही आहे, कारण वजन घटविण्यासाठी सत्तर टक्के आहारनियम आणि उर्वरित तीस टक्के व्यायाम असे समीकरण आहारतज्ज्ञांनी सांगितलेले आहे. त्यामुळे केवळ भरपूर व्यायाम करूनही जर आहारावर नियंत्रण नसेल, तर वजन घटविण्याच्या प्रयत्नांना यश येत नाही. हे वास्तव आता सर्वमान्य असल्यामुळे वजन घटविण्यासाठी आता आहारावर जास्त लक्ष दिले जाऊ लागले आहे. त्यासाठी निरनिराळ्या आहारपद्धती किंवा डायट अवलंबली जात असतात. या अनेकविध आहारपद्धतींपैकी सध्याच्या काळामध्ये कीटो, किंवा कीटोजेनिक डायट विशेष लोकप्रिय ठरत आहे. त्याविषयी जाणून घेऊ या.




कीटोजेनिक आहारपद्धतीमध्ये कर्बोदकांचे सेवन अतिशय कमी असून, यामध्ये स्निग्ध पदार्थांचे, म्हणजे फॅटस् चे सेवन अधिक आहे. येथे स्निग्ध पदार्थांचा अर्थ ङ्गतळलेले किंवा तेलकट, तुपकट पदार्थफ असा नसून, ज्यामध्ये नैसर्गिक फॅटस् आहेत असे पदार्थ, असा आहे. तसेच शरीराला आवश्यक तेवढी प्रथिने देखील या आहारपद्धतीच्या अंतर्गत सेवन करायची आहेत. या डायटमुळे शरीरामध्ये साठलेली अतिरिक्त चरबी घटण्यास मदत होते. या आहारामध्ये स्निग्ध पदार्थांचे सेवन अधिक असून, या स्निध पदार्थांचे चयापचय होत असताना ङ्गकीटोन्सफ नामक कंपाउंड तयार होत असतात. शरीराला सक्रीय राहण्याकरिता जी उर्जा आवश्यक आहे ती या कीटोन्स कडून मिळत असते. थोडक्यात सांगायचे झाले, तर शरीराला सक्रीय ठेवण्यासाठी जी उर्जा आवश्यक असते, ती शरीरातील कीटोन्स मधून घेतली जात असल्याने या आहारपद्धतीच्या अवलंबामुळे कॅलरीज वेगाने खर्च होतात.

या आहारपध्दतीमध्ये कर्बोदकांचे प्रमाण अतिशय कमी असल्याने ब्लड शुगर लेव्हल्स मध्ये वाढ होत नाही, आणि त्या नियंत्रित राहतात. त्यामुळे मधुमेह असणाऱ्या व्यक्तींसाठी ही आहार पद्धत लाभकारी आहे. या आहारपद्धतीमुळे ट्रायग्लिसराईड आणि एलडीएल कोलेस्टेरोलची पातळी कमी होत असून, एचडीएल (दद् म्प्दर्तेीदत) ची पातळी वाढते. त्यामुळे हृदयाचे आरोग्य उत्तम ठेवण्यासाठी देखील हे डायट चांगला पर्याय आहे.

तसेच या आहारामध्ये स्निग्ध पदार्थांचा समावेश जास्त असल्याने भूक लवकर शमून, वारंवार भूक लागणे, किंवा एखादा पदार्थ, विशेषत: गोड पदार्थ सतत खावासा वाटणे ( मिरन्हे ) अश्या प्रकारच्या भावना कमी होऊ लागतात.

या आहार पद्धतीमध्ये सागरी खाद्य (ीं षददे), म्हणजेच मासे समाविष्ट केले जातात. यांमध्ये कर्बोदकांचे प्रमाण कमी असून, प्रथिनांचे प्रमाण जास्त असते.

तसेच शरीराला आवश्यक अश्या ओमेगा थ्री फॅटी ॲसिडचे प्रमाणही यामध्ये मुबलक आहे. त्यामुळे आठवड्यातून किमान दोनवेळा मासे कीटो डायटमध्ये समाविष्ट केले जावेत. मांसाहारी व्यक्तींना माश्यांच्या जोडीने चिकन व अंडी आहारामध्ये समाविष्ट करता येतील. क जीवनसत्व आणि क्षार असलेल्या भाज्या व फळे या आहार पद्धतीमध्ये समाविष्ट करायची आहेत. यामध्ये ताजा पालक, ब्रोकोली, फ्लॉवर, ॲव्होकाडो, दही, पनीर, सुका मेवा, वेगवेगळ्या बिया (सूर्यफूल, भोपळा, अळशी, चिया सीड) इत्यादींचा समावेश आहे. या व्यतिरिक्त घरचे ताजे लोणी, साखर आणि दुध विरहित चहाकॉफी, चीझ या पदार्थांचा समावेश आहारामध्ये करावा.



होमवर्क: आपल्या आवडीप्रमाणे आणि योग्य रंग निवडून चित्रामध्ये रंग भरा

### या रहस्यमयी शहराच्या रहिवाश्यांकडे
## आहे अलौकिक सिध्दी

एखादी व्यक्ती मृतात्म्यांशी संवाद साधू शकते असे आजच्या काळामध्ये कोणी आपल्याला सांगितले, तर आपला त्यावर विश्वास बसेलच असे नाही. आजचे युग हे विज्ञानाचे आहे आणि जगामध्ये घडणाऱ्या सर्वच गोष्टींना वैज्ञानिक आधार आहेत. त्यामुळे या विज्ञानाच्या कक्षेच्या पलीकडे जाऊन काही गोष्टी या जगामध्ये घडत असतात हे मान्य करणे आपल्या काहीसे कठीणच जाते. पण या जगामध्ये एक शहर असे ही आहे, जिथे केवळ एखाद्याच व्यक्तीला नाही, तर बहुतांश लोकांना अलौकिक सिद्धी प्राप्त असल्याचे म्हटले जाते. मृतात्म्यांशी संवाद साधू शकण्याची अलौकिक सिद्धी या लोकांना प्राप्त असल्याचे म्हटले जाते. अमेरिकेतील कासाडागा टाऊन हे शहर जगातील काही रहस्यमयी शहरांपैकी एक म्हणावे लागेल. या शहराला ङ्गसायकिक कॅपिटलफ या नावाने देखील संबोधले जाते. या शहरामध्ये राहणारे बहुतेक लोक मनोविज्ञानामध्ये पारंगत असून, ङ्गपॅरानॉर्मल सायन्सेसफ मध्ये प्रवीण आहेत. या जगामध्ये हयात नसलेल्या लोकांच्या आत्म्यांशी संवाद साधण्याची सिद्धी या शहरातील बहुतांश लोकांना प्राप्त असल्याचे म्हटले जाते. १८७५ साली न्यूयॉर्क येथील अध्यात्मिक गुरु जॉर्ज कॉल्बी यांनी हे शहर वसविले होते. सुरुवातीला काही मोजकेच रहिवासी असणाऱ्या शहराची ख्याती जशी सर्वत्र पसरू लागली, तसे अध्यात्मिक शक्तींकडे ओढा असणारे लोक या ठिकाणी येऊन स्थायिक होऊ लागले. येथे राहून त्यांनी अनेक अलौकिक सिद्धी प्राप्त केल्या असल्याचे म्हटले जाते. आजच्या काळामध्ये या शहरामध्ये अलौकिक सिद्धी प्राप्त असलेले शंभराच्या वर गुरु आहेत.

## सकारात्मक घरामध्येच लक्ष्मी निवास करते त्यासाठी काही टिप्स



आपले घर हे आपले विश्रांतीचे, परिवारासोबत एकत्र राहून आनंदाचे क्षण व्यतीत करण्याचे स्थान असते. घरातील वातावरण सकारात्मक असेल, तर त्याचा प्रभाव घरातील मंडळींच्या आरोग्यावर आणि मनस्थितीवरही होत असतो. त्या उलट जर घरातील वातावरण नकारात्मक असेल तर घरामध्ये सतत वाद, कलह, आर्थिक नुकसान, आरोग्यासंबंधी तक्रारी उद्भवू लागतात. त्यामुळे घरातील वातावरण सकारात्मक राहण्यासाठी आणि त्याद्वारे घरातील मंडळींची मनस्थिती प्रसन्न आणि आपापसात सौख्य राहण्यासाठी काही विशेष उपाय वास्तूशास्त्रामध्ये सांगण्यात आले आहेत.वास्तूशास्त्राच्या अनुसार घराच्या मुख्य प्रवेशद्वाराला शक्यतो हलका रंग दिलेला असावा. घराचा मुख्य दरवाजा काळ्या, किंवा गडद राखाडी रंगाचा असू नये. त्याचबरोबर घराच्या प्रवेशद्वारापाशी दिवसा आणि रात्री भरपूर उजेड राहील याची दक्षता घेतली जावी. घरामध्ये राहणाऱ्या मंडळींसाठी किंवा घरामध्ये येणाऱ्या पाहुण्यांसाठी चपला ठेवण्याचे कपाट किंवा स्टँड प्रवेशद्वाराच्या बाहेर, दरवाजाला लागून असू नये. त्याऐवजी हा स्टँड किंवा कपाट मुख्य दरवाजाच्या आतमध्ये एका बाजूला असणे चांगले.घरामध्ये उभ्याने पूजा केली जात असल्यास देवघर जमिनीवर न ठेवता, देवघरामध्ये असणारे देव आपल्या दृष्टीच्या समोर, म्हणजेच ङ्गआय लेव्हलफ्रर असतील अशा रीतीने देवघर मांडले जावे. तसेच हे देवघर शक्यतो लाकडी किंवा संगमरावरी असणे शुभ मानले गेले आहे. देवघर नेहमी पूर्वेला किंवा उत्तर-पूर्वेला असणे चांगले. या दिशांना सकारात्मक उर्जेचे संचरण अधिक असते. घरामध्ये दक्षिण-पूर्व दिशेला लावलेली पणतीची किंवा निरांजनाची ज्योत घरामध्ये सकारात्मक वातावरण आणणारी आहे. घरातील मुख्य बैठकीची खोली पूर्वेला, उत्तरेला, उत्तर-पूर्वेला किंवा दक्षिण-पश्चिम दिशेला असणे चांगले. घरातील टीव्ही, म्युझीक सिस्टम इत्यादी उपकरणे बैठकीच्या खोलीमध्ये दक्षिण-पूर्वी दिशेला असावीत. बैठकीच्या खोलीतील जड फर्निचर, उदाहरणार्थ सोफा, खोलीच्या पश्चिमेला असावा. झोपण्याची खोली घरामध्ये दक्षिण-पश्चिम दिशेला असणे चांगले मानले जाते. बेडरूममध्ये झोपताना आपले डोके पश्चिमेकडे राहील अशा पद्धतीने बेड ठेवलेला असावा. बेडच्या बरोबर समोरच्या भिंतीवर आरसा लावणे टाळावे. त्यामुळे घरामध्ये कलह उत्पन्न होत असल्याचे वास्तूशास्त्र सांगते. जर घराच्या सभोवताली अंगण असेल, तर ते स्वच्छ राहील याची दक्षता घ्यावी. अंगणामध्ये कुठेही कचरा, सांडपाणी साठून राहणार नाही याची काळजी घ्यावी.

## स्वस्थ त्वचेकरता काय खावे?

### डॉक्टर टीप्स

पौरुषत्व वाढवण्यासाठी खा हे १० पदार्थ



संतुलित आहार आरोग्यासाठीच नव्हे तर प्रजनन क्षमता वाढविण्यासाठीही आवश्यक आहे. शरीरात टेस्टोस्टेरॉनचे स्तर कमी झाल्याने सेक्स लाईफवर वाईट परिणाम होतो. यासाठी योग्य आहार घेणे आवश्यक आहे. याव्यतिरिक्त ताण न घेणे आणि अधिक गोड व तळकट पदार्थ खाणे टाळावे. तर चला सांगू पौरुषत्व वाढवण्यासाठी कोणते १० पदार्थ आहारा सामील केले पाहिजे.

**● सुखे मेवे**

ड्राय फ्रूट्समध्ये जिंक आढळतं तसेच ब्राझील नट्सही खाणे फायदेशीर ठरेल.

## विन-संदेश





बंडू शाळेतून धावतच घरी आला आणि आईला म्हणाला, 'आई, आज वर्गात शिक्षकांच्या प्रश्नाला मझ्याशिवाय कुणीच उत्तर देऊ शकलं नाही!' आईने विचारले, 'अरे वा. प्रश्न काय होता.' शिक्षकांच्या टेबलाचा पाय कोणी मोडला!'

Doctor: dekhiye, yeh bimaari khaandaani hai. aapke daadaaji se shuru hui hai.
Patient: bach gaya!!! tab aap yeh operation mere daadaaji ko hee keejiye.

## सुविचार



चूक ही चिवट वनस्पती आहे, ती वाटेल त्या भूमीत फोफावते.

– मार्टिन रूपर


### संस्कृत सुभाषित

अतो हास्यतरं लोके किंचिदन्यन्न विद्यते
यत्र दुर्जनमित्याह, दुर्जन: सज्जनं स्वयम्।।
(आदिपर्व, अध्याय ७४, ेाक ९५ महाभारत)

**अर्थ** :स्वत: दुर्जन असणाऱ्याने सज्जनालाच दुर्जन म्हणावे, यापेक्षा हास्यास्पद गोष्ट दुसरी कुठलीच नसेल

## मनोरंजक महाशब्दकोडे

कोडे क्र. ९३



### आडवे शब्द

१. बारमाही फुलणारे फूल
४. हवामान, स्थिती
७. चंद्र
११. दयाळू
१३. निकृष्ट दर्जाचे
१४. एकरूपता
१५. च्या सह
१७. वास्तुभोवतीचा परिसर
१८. आदर, सन्मान
१९. भादुरी पण जया नव्हे!
२०. वाहून नेणारा
२२. लहान
२३. पक्ष, बाजू
२५. अंधार
२६. दार, कवाड
२८. लोक, प्रजा
२९. मनाला टोचणारे दु:ख
३०. हे माणसाला नादान बनवते?
३१. लाडवाला घडवणारा किंवा बिघडवणारा!
३२. जेव्हा
३३. राग अणणारे (कृत्य)
३५. ही गहाण ठेवून काय होणार!
३६. मारला गेलेला
३७. आयुष्यभर
३८. शिकारीसाठी हेरलेला प्राणी
३९. ललाट
४१. प्राण, जीव (हिंदी)
४२. आणि
४३. शिक्षा
४५. सोंग वठवणारा
४७. फाडलेल्या दुधाच्या वड्या
४८. आई
५०. राजाचा निरोप्या, वकील इ.
५२. सोन्याचा कस
५३. नाद, छंद, सरावाने घडणारी गोष्ट
५४. खबदाड
५५. मंगळवारची चतुर्थी
५७. रोड, अशक्त
६०. घर
६२. अटीची भाषा
६३. आंदोलन, लढा
६४. महात्मा गांधीजींचे अखेरचे शब्द
६५. बाळाच्या अंगावरची तेलहळदीने जाते
६६. थरथर
६७. गाभाऱ्यात तेवणारी
६८. कोणाचा खालच्या पट्टीतला कोणाचा वरच्या
६९. ऱ्हास
७१. दशानन
७२. हिंदीत रहस्य
७३. गाढव
७४. ऐट, दिमाख
७७. वाणी, बोलणे
७९. मधुमक्षिका
८१. प्रश्न
८२. एखादे काम करण्यास समर्थ
८३. अतिशय वेदना

### उभे शब्द

१. पातळसर
२. मोफत
३. नम्र, वाकलेला
४. रेती
५. राबता, पायंडा
६. फलंदाजाऐवजी धावपळ करणारा
७. फूल, पुष्प
८. पात्याची तीक्ष्णता
९. सत्त्व
१०. उपवासाला चालणारा कंद
१२. बातमीदार
१४. सम, सारखा
१६. खेळातून हद्दपार
२०. वाद्यवृंदातील कलाकार
२१. सैन्याची परेड
२२. छोटा
२३. केस काळे करणारा
२४. जन्मदाते
२७. जास्त
२८. होडी, जहाज इ.
२९. एक तारवाद्य
३०. राक्षस
३१. शिक्षणव्यवस्थेच्या त्रिकोणापैकी विद्यार्थी-शिक्षकांबरोबरचा तिसरा
३३. शक्यता असलेले
३४. ज्या प्रमाणे
३५. अमावस्या
३६. दुष्ट, नीच
३७. सहस्त्र
४०. पर्ण
४४. जादू करणारा
४६. भ्रष्टाचार
४७. वारा, मरूत
४८. टोकिओ या देशाची राजधानी
४९. पुरुष
५१. शहाणा, हुशार
५४. पाऊल (हिंदी)
५५. हनुमानाची माता
५६. पोपट
५८. वेदना, खटका
५९. डावरा
६०. निष्णात, वाकबगार
६१. चीजवस्तू
६४. सुवर्ण
६५. नुसताच शोभेचा फौजफाटा
६७. उत्सवाचे दिवस
६८. पूजा, प्रार्थना इ.
६९. उद्यानंतरचा दिवस
७०. धुंदी, कैफ
७३. वाळा
७५. शरीरातील नाडी
७६. कौसल्यापुत्र
७८. चक्र
७९. अभिप्राय
८०. अब्रू

### आडवे उत्तर

१.सदाफुली ४.वातारण ७.सुधाकर ११.कनवाळू १३.हीन १४.समरसता १५.सकट १७.आवार १८.मान १९.रीटा २०.वाहक २२.सान २३.कड २५.तम २६.दरवाजा २८.जन २९.सल ३०.दान ३१.पाक ३२.यदा ३३.संतापजनक ३५.अक्कल ३६.हत ३७.हयातभर ३८.सावज ३९.कपाल ४१.जान ४२.व ४३.सजा ४५.नकलाकार ४७.पनीर ४८.जननी ५०.दूत ५२.टच ५३.सवय ५४.कपार ५५.अंगारकी ५७.लुकडा ६०.सदन ६२.जरतर ६३.चळवळ ६४.हे राम ६५.लव ६६.कंप ६७.समई ६८.आवाज ६९.पतन ७१.रावण ७२.राज ७३.खर ७४.शान ७७.वाचा ७९.मधमाशी ८१.सवाल ८२.सक्षम ८३.नरकयातना

### उभे उत्तर

१.सरसरीत २.फुकट ३.लीन ४.वाळू ५.वहिवाट ६.रनर ७.सुमन ८.धार ९.कस १०.रताळे १२.वार्ताहर १४.समान १६.कटाप २०.वादक २१.कवायत २२.सान २३.कलप २४.जनकजननी २७.जादा २८.जलयान २९.सतार ३०.दानव ३१.पालक ३३.संभवनीय ३४.जसा ३५.अवस ३६.हलकट ३७.हजार ४०.पान ४४.जादूगार ४६.लाचलुचपत ४७.पवन ४८.जपान ४९.नर ५१.तरतरीत ५४.कदम ५५.अंजनी ५६.कीर ५८.कळ ५९.डावखेरा ६०.सराईत ६१.ऐवज ६४.हेम ६५.लवाजमा ६७.सणवार ६८.आराधना ६९.परवा ७०.नशा ७३.खस ७५.नस ७६.राम ७८.चाक ७९.मत ८०.शील



# क्रीडा विश्व





चीनमधील झांगजियाजी येथील हुआंगशिझाई या निसर्गरम्य ठिकाणी झालेल्या मफस्लॅकलाइन किंगफ्फस्पर्धेत भाग घेताना ब्राझिलियन स्पर्धक कौटिन्हो.

## थोडक्यात/ संक्षिप्त

### ना बाबर ना रिझवान, आशिया कप साठी पाकिस्तानने जाहीर केला संघ, विराटच्या दुश्मनासह 'या' १५ खेळाडूंना संधी

नवी दिल्ली–पुढील महिन्यात होणाऱ्या आशिया कप स्पर्धेसाठी पाकिस्तान क्रिकेट संघाने आपला संघ जाहीर केला आहे. पाकिस्तानचा संघ सलमान अली आगा यांना नेतृत्वाखाली खेळणार असून विशेष म्हणजे बाबर आझम आणि मोहम्मद रिझवान यांना संघात स्थान देण्यात आले नाही. त्यामुळे आता पाकिस्तानच्या नव्या संघाची चर्चा होताना दिसत आहे.

गेल्या आशिया कपमध्ये बाबर आझम पाकिस्तान संघाचा कॅप्टन होता. आता बाबर आझमला त्याच्या खराब फॉर्ममुळे संघातून नारळ देण्यात आला आहे. तसेच मोहम्मद रिझवान याला देखील बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला आहे. तर शाहीन शाह आफ्रिदी याची संघात पुन्हा एन्ट्री झाली आहे. येत्या १४ तारखेला शाहीन शाह भारताविरुद्ध खेळताना दिसेल.

आशिया कपसाठी पाकिस्तानचा संघ

सलमान अली (कॅप्टन), अबरार अहमद, फहीम अशरफ, फखर जमान, हरिस रऊफ, हसन अली, हसन नवाज, हुसैन तलत, खुशदिल शाह, मोहम्मद हारिस (विकेटकीपर), हसन नवाज, वसीम जूनियर, साहिबजादा फरहान, सॅम अयूब, सलमान मिर्जा, शाहीन शाह अफरीदी, सुफयान मोकिम.

***

### अर्जुन तेंडुलकरला साखरपुड्याच्या चर्चादरम्यान मोठा धक्का

मुंबई –मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरचा लेक अर्जुन तेंडुलकरचं नाव सध्या चर्चेचा विषय आहे. अर्जुन तेंडुलकरने साखरपुडा केल्याची चर्चा सोशल मीडियावर सुरू आहे. अर्जुनने उद्योजक रवी घई यांची नात सानिया चंडोक हिच्याशी साखरपुडा केल्याचं म्हटलं जातं आहे. पण याबाबत दोन्ही कुटुंबापैकी कोणीही अद्याप अधिकृत माहिती दिलेली नाही. यादरम्यान आता अर्जुन तेंडुलकरला मोठा धक्का बसला आहे.

अर्जुनला २८ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या मोठ्या स्पर्धेतून वगळलं आहे. या स्पर्धेत अनेक मोठे खेळाडू खेळताना दिसणार आहेत, पण सचिनच्या लेकाला मात्र डच्चू देण्यात आला आहे. गोव्याकडून देशांतर्गत क्रिकेट खेळणारा अर्जुन तेंडुलकर दुलीप ट्रॉफीमध्ये खेळण्याची आशा बाळगत होता, परंतु नॉर्थ इस्ट झोनच्या संघाने मात्र त्याला धक्का दिला आहे.रणजी ट्रॉफीच्या प्लेट ग्रुपमधील चार सामन्यांमध्ये १६ विकेट्स घेणाऱ्या अर्जुन तेंडुलकरला दुलीप ट्रॉफीसाठी नॉर्थ इस्ट झोन संघात स्थान देण्यात आलेलं नाही. रोंगसेन जोनाथनच्या नेतृत्वाखालील हा संघ २८ ऑगस्ट रोजी सेंट्रल झोनशी भिडणार आहे. अर्जुन तेंडुलकरने रणजी ट्रॉफीच्या प्लेट ग्रुपच्या चार सामन्यांमध्ये १६ विकेट्स घेतल्या, या जोरावर गोव्याने प्लेट डिव्हिजनचे विजेतेपद पटकावले.

अर्जुन २०२२–२३ हंगामापासून गोव्याकडून खेळत आहे. या दरम्यान, अर्जुनने गोव्यासाठी संस्मरणीय पदार्पण केले आणि डिसेंबर २०२३ मध्ये त्याच्या पहिल्या प्रथम श्रेणी सामन्यात शतक झळकावले. प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये त्याच्या नावावर ३७ विकेट्स आणि ५३२ धावा आहेत. नोव्हेंबर २०२२ मध्ये गोव्यासाठी लिस्ट ए मध्ये पदार्पण करणाऱ्या अर्जुनने १८ सामन्यांमध्ये २५ विकेट्स घेतल्या आणि १०२ धावा केल्या.दुलीप ट्रॉफीचे सामने कधी सुरू होणार?

गोवा संघात सामील येण्यापूर्वी त्याने मुंबईसाठी टी–२० मध्ये पदार्पण केले. अर्जुन आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्स (एमआय) कडूनही खेळला आहे. तो २०२१ पासून मुंबई संघाचा भाग आहे. २८ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या दुलीप ट्रॉफीमध्ये अनुभवी फलंदाज शुबमन गिल आणि ऋतुराज गायकवाड खेळताना दिसणार आहेत. टीम इंडियाचा कसोटी संघाचा कर्णधार शुबमन गिल आणि अनुभवी फलंदाज ऋतुराज गायकवाड दुलीप ट्रॉफीमध्ये खेळतील. या स्पर्धेत शार्दुल ठाकूरच्या नेतृत्वाखाली ऋतुराज गायकवाड वेस्ट झोनच्या संघाकडून खेळेल. इंग्लंडमध्ये फलंदाजीने चमकदार कामगिरी करणारा शुबमन गिल दुलीप ट्रॉफीमध्ये नॉर्थ झोन संघाचे नेतृत्व करेल.२८ ते ३१ ऑगस्ट दरम्यान होणाऱ्या या स्पर्धे तील पहिल्या सामन्यात नॉर्थ झोनचा सामना ईशान किशनच्या नेतृत्वाखालील ईस्ट झोनविरूद्ध होणार आहे तर नॉर्थ इस्ट झोनचा सामना ध्रुव जुरेलच्या नेतृत्वाखालील सेंट्रल झोनविरूद्ध होणार आहे.

***

### गिल की जैस्वाल? आशिया चषकासाठी सलामीवीर म्हणून कोणाला संधी मिळणार?

नवी दिल्ली–आशिया चषक २०२५ स्पर्धा सुरू व्हायला अवघे काही दिवस शिल्लक राहिले आहेत. ही स्पर्धा युएईत रंगणार आहे. या स्पर्धेसाठी अजूनही भारतीय संघाची घोषणा करण्यात आलेली नाही. माध्यमातील वृत्तानुसार, या आठवड्यात भारतीय संघाची घोषणा केली जाऊ शकते. यावेळी ही स्पर्धा टी–२० फॉरमॅटमध्ये खेळवली जाणार आहे. या स्पर्धेसाठी भारतीय संघाची निवड करणं हे निवड समितीसाठी मुळीच सोपं नसणार आहे. भारतीय संघात ४ असे फलंदाज आहेत जे सलामीवीर फलंदाज म्हणून संघात स्थान मिळवण्यासाठी प्रबळ दावेदार आहेत. दरम्यान या चौघांपैकी कोणाला संधी मिळणार? याबाबत आर अश्विनने मोठं वक्तव्य केलं आहे.रोहित शर्माने टी–२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटला रामराम केल्यापासून संजू सॅमसन आणि अभिषेक शर्मा हे दोघे डावाची सुरूवात करण्यासाठी मैदानात येत आहेत. तर यशस्वी जैस्वालला आयसीसी टी–२० वर्ल्डकप २०२४ स्पर्धेत राखीव सलामीवीर फलंदाज म्हणून संधी दिली गेली होतीय कसोटी संघाचा कर्णधार शुबमन गिल देखील सलामीवीर फलंदाज म्हणून संघात स्थान मिळवण्यासाठी प्रबळ दावेदार आहे.

## तपस्याची जागतिक कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदकाला गवसणी



**नवी दिल्ली:**तपस्याने निर्णायक लढतीत नॉर्वेच्या फेलिसितास दोमाजेवाचा ५–२ असा पराभव केला. तपस्याने उपांत्य फेरीत गतविजेत्या सोमाका उचिदा हिला हरवून आपण सुवर्णपदकाचे प्रबळ दावेदार असल्याचे दाखवून दिले होते. तेच नेमके साध्य करताना तिने अंतिम सामन्यांत मोक्याच्यावेळी गुण जिंकले.

प्रिया मलिक आणि रीनाने अंतिम फेरीत धडक मारली आहे. वयोगटाच्या स्पर्धेत प्रियाने दुसऱ्यांदा अंतिम फेरी गाठली. तिने ७६ किलो वजनी गटाच्या उपांत्य फेरीत सर्बियाच्या एवलिन उझे–लजीला अवघ्या तीन मिनिटांत चीतपट करून १०–० असा विजय मिळवला. प्रियाने याच वजनी गटात ज्युनिअर स्पर्धेत विजेतेपद जिंकले आहे. प्रियाने रशियाच्या डायना तितोवाला ४–० असे एकतर्फी लढतीत हरवले होते.बायको दिसावी नोरा फतेहीसारखी! पती रोज ३–३ तास व्यायाम करुन घ्यायचा, उपाशी ठेवायचा, अखेर...

आशियाई २३ वर्षाखालील आणि तसेच ज्युनियर गटातील विजेत्या रिनाने धडाका जागतिक स्पर्धेतही कायम ठेवला आहे. तिने ५५ किलो गटाच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. तिने उपांत्य फेरीत रुमानियाच्या अलेक्झांड्रा वॉईकुलेस्कू हीला एकतर्फी लढतीत ११–१ असे हरवले. तिने यापूर्वी उपउपांत्यपूर्व फेरीच्या लढतीत गतस्पर्धेतील उपविजेत्या खालिऊन ब्यामबासुरेन (मंगोलिया) हिला ११–६ असे हरवले होते. रिनाने ०–४ पिछाडीनंतर प्रतिस्पर्धीस चीतपट केले होते.



### फलंदाजांच्या आयसीसी क्रमवारीतून रोहित शर्मा–विराट कोहलीची नावे गायब

दुबई : भारतीय कर्णधार रोहित शर्मा आणि विराट कोहलीची नावे आयसीसीच्या ताज्या क्रमवारीतून गायब झाली आहेत. गेल्या आठवड्यात जाहीर झालेल्या क्रमवारीत दोन्ही भारतीय फलंदाज टॉप–५ मध्ये होते. रोहित शर्मा दुसऱ्या क्रमांकावर होता तर विराट कोहली चौथ्या क्रमांकावर होता. पण बुधवारी जेव्हा एकदिवसीय फलंदाजांच्या क्रमवारीत जाहीर करण्यात आले तेव्हा त्यात रोहित शर्माचे नाव किंवा विराट कोहलीचे नाव नव्हते.

काही चुकीमुळे किंवा तांत्रिक कारणामुळे हे घडले असण्याची शक्यता आहे. कारण याआधीही आयसीसीच्या क्रमवारीत चुका झाल्या आहेत. ज्यानंतर दुरुस्त करण्यात आल्या आहेत. ३ वर्षांपूर्वी आयसीसीने चुकून भारतीय संघाला नंबर–१ कसोटी संघ बनवले होते. त्यानंतर सुमारे अडीच तासांनंतर ही चूक दुरुस्त करण्यात आली होती.

ताज्या क्रमवारीत शुभमन गिल ७८४ गुणांसह नंबर–१ वर कायम आहे, तर बाबर आझम दुसऱ्या क्रमांकावर आला आहे. गिल व्यतिरिक्त, श्रेयस अय्यर हा एकदिवसीय फलंदाजांच्या क्रमवारीत पहिल्या १० मध्ये स्थान मिळवणारा एकमेव भारतीय क्रिकेटपटू आहे.

## टीम इंडियाची घोषणा, सूर्याच्या नेतृत्वात शुभमन गिलला प्रमोशन

दिल्ली,१९ ऑगस्ट (पीएसआय) आगामी आशिया कप स्पर्धेची उत्सुकता शिगेला पोहोचली असताना आता बीसीसीआयने भारतीय संघाची घोषणा केली आहे. मुंबईत झालेल्या सिलेक्शन कमिटीच्या बैठकीनंतर चीफ सिलेक्टर अजित आगरकर आणि कॅप्टन सुर्यकुमार यादव यांनी पत्रकार परिषद घेत संघ जाहीर केला. आशिया कपसाठी भारतीय संघात १५ खेळाडूंना स्थान दिलं गेलं असून सूर्यकुमार यादव टीम इंडियाचं नेतृत्व करेल. कसा आहे भारताचा संघ?

आशिया कपसाठी टीम इंडिया सूर्यकुमार यादव (उर्रीरिळप), शुभमन गिल (तउ), अभिषेक शर्मा, तिलक वर्मा, हार्दिक पांड्या, शिवम दुबे, अक्षर पटेल, जितेश शर्मा, जसप्रीत बुमराह, वरूण चक्रवर्ती, अर्शदीप सिंग, कुलदीप यादव, संजू सॅमसन, हर्षित राणा, रिंकू सिंग.

प्रसिद्ध कृष्णा, वॉशिंग्टन सुंदर, रियान पराग, ध्रुव जुरेल आणि यशस्वी जयस्वाल यांना स्टँडबाय खेळाडू म्हणून तयार राहण्यास सांगितलं आहे. टीम इंडिया सुर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली खेळेल. तर शुभमन गिलवर व्हाईस कॅप्टन्सीची जबाबदारी देण्यात आली आहे. त्यामुळे शुभमन गिल प्लेइंग इलेव्हनमध्ये असेल. त्याम ुळे संजू सॅमसनची प्लेइंग इलेव्हनमधून हकालपट्टी निश्चित दिसतीये. तर ऑलराऊंडर म्हणून शिवम दुबेला संधी मिळेल की नाही? यावर शंका आहे. त्याचबरोबर अर्शदीप सिंगसोबत जसप्रीत बुमराह आशिया कप खेळणार आहे. वरूण चक्रवर्ती आणि कुलदीप यादव या दोन फिरकीपटूंची जादू पहायला मिळू शकते.

दरम्यान, आशिया कपचा १७ वा हंगाम येत्या ९ सप्टेंबरपासून सुरू होईल. भारतीय संघ १० सप्टेंबर रोजी यूएईविरुद्ध स्पर्धेत आपला पहिला सामना खेळेल. त्यानंतर पाकिस्तानविरुद्धचा १४ सप्टेंबर रोजी दुबईमध्ये सामना खेळवला जाणार आहे. भारताचा शेवटचा गट फेरीचा सामना १९ सप्टेंबर रोजी अबूधाबीमध्ये ओमानविरुद्ध होईल. त्यानंतर फायनल सामना २८ सप्टेंबर रोजी खेळवला जाईल.





स्पेनमधील बार्सिलोना येथे झालेल्या ला लीगा फुटबॉल सामन्यात भाग घेताना ॲटलेटिको डी माद्रिद आणि आरसीडी एस्पानियोलचे खेळाडू.

### रोहितला चॅम्पियन बनवले, गंभीरला आयपीएल जिंकवली; तरीही आशिया कपमध्ये संधी नाही!



दिल्ली–येत्या ९ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या आशिया कपसाठी टीम इंडियाची घोषणा झाली आहे. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली टीम इंडिया खेळेल. तर शुभमन गिल याला संघात संधीच मिळाली नाही तर त्याला व्हाईस कॅप्टन्सी देखील देण्यात आली आहे. तसेच रिंकु सिंग याला देखील स्कॉडमध्ये जागा मिळालीये. अशातच ज्या खेळाडूला आशिया कपम ध्ये संधी मिळेल, अशी पूर्ण शक्यता होती त्याच खेळाडूला डच्चू देण्यात आला आहे. टीम इंडियामध्ये श्रेयस अय्यर याला संधी मिळाली नाही.

श्रेयस अय्यरला संधी का नाही?

अलीकडच्या काळात त्याने केलेली शानदार काम गिरी पाहता, त्याच्या निवडीची अनेकांना अपेक्षा होती. विशेषत: आयपीएलमध्ये त्याने पंजाब किंग्सचे यशस्वी नेतृत्व केलं आणि चांगला फॉर्म दाखवला. त्यामुळे, त्याच्या अनुपस्थितीमुळे अनेक क्रिकेटप्रेमींना आश्चर्याचा धक्का बसला आहे. विशेष म्हणजे राखीव खेळाडूंच्या यादीत देखील श्रेयस अय्यरला संधी मिळाली नाही.

अजित आगरकर म्हणाले... आशिया कप युएईमध्ये होत असल्याने श्रेयसला संधी मिळेल, अशी पूर्ण शक्यता होती. याच युएईमध्ये श्रेयसने चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकवून दिली होती. मात्र, अखेरच्या क्षणी शुभमन गिलची एन्ट्री झाल्याने आता श्रेयसला बाहेरच बसावं लागतंय. तसेच शिवम दुबेला ऑलराऊंडर म्हणून संधी दिल्याने श्रेयसची जागा गेली का? असा सवाल देखील विचारला जात आहे. श्रेयस अय्यरच्या बाबतीत, तो कोणाची जागा घेऊ शकतो? असा सवाल अजित आगरकर यांनी प्रेस कॉन्फरेन्समध्ये विचारला. यात त्याची चूक नाही, पण आपलीही नाही, असंही ते म्हणाले.आशिया कपसाठी टीम इंडिया – सूर्यकुमार यादव (उर्रीरिळप), शुभमन गिल (तउ), अभिषेक शर्मा, तिलक वर्मा, हार्दिक पांड्या, शिवम दुबे, अक्षर पटेल, जितेश शर्मा, जसप्रीत बुमराह, वरूण चक्रवर्ती, अर्शदीप सिंग, कुलदीप यादव, संजू सॅमसन, हर्षित राणा, रिंकू सिंग.

### मफश्रेयस तिथे कोणाला तरी आवडत नसेल, गंभीरच्या माजी सहकाऱ्याचा मोठा आरोप

#### आशिया कपमध्ये संधी न मिळण्याबद्दल म्हणाला

मुंबई–आशिया चषक २०२५साठी टीम इंडियाची घोषणा करण्यात आली आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे आयपीएल आणि देशांतर्गत शानदार कामगिरी करणाऱ्या श्रेयस अय्यरला या संघात स्थान मिळालेलं नाही. याहून महत्त्वाचं म्हणजे अय्यरचा राखीव खेळाडूंमध्येही समावेश नाही. अय्यरची निवड न झाल्यानंतर सोशल मीडियावर गोंधळ उडाला आहे. अनेक जण यावर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. दरम्यान माजी भारतीय सहाय्यक प्रशिक्षकांनी यावर मोठं वक्तव्य केलं आहे.

श्रेयस अय्यरला भारताच्या आशिया चषक संघात संधी न मिळाल्याने चाहते टीम इंडियाच्या निवड समिती आणि मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरवर टीका करत आहेत. अय्यरचे चाहतेच नाही तर टीम इंडियाचे माजी सहाय्यक प्रशिक्षक अभिषेक नायर यांनीही याबाबत आश्चर्य व्यक्त केलं आहे. आशिया चषकासाठी टीम इंडियाची घोषणा झाल्यानंतर, अभिषेक नायर स्टार स्पोर्ट्स शोमध्ये संघाबाबत चर्चा करताना दिसले. तिथे त्यांनी अय्यरला संघात स्थान न मिळाल्याबद्दल आश्चर्य व्यक्त केलं. त्याने टीम इंडियाला हा प्रश्न विचारला की जर अय्यर इतका चांगला खेळाडू आहे, तर तो १५ खेळाडू तर सोडाच, उर्वरित पाच राखीव खेळाडूंच्या यादीत का नाही?

अभिषेक नायर म्हणाला, ''जर तो संघात असण्याइतका चांगला खेळाडू होता तर तो राखीव खेळाडूंमध्ये का नाही? निवड बैठकीत अनेकदा रोचक मुद्द्यांवर चर्चा होतात, पण मला समजत नाही की श्रेयस अय्यरला २० खेळाडूंच्या स्कॉडमध्येही का स्थान मिळालं नाही. मी १५ खेळाडूंबद्दल बोलत नाहीये तर २० खेळाडूंबद्दल बोलतोय. हा श्रेयस अय्यरसाठी सरळ मेसेज आहे की तू २० खेळाडूंमध्येही नाहीस. तू संघात असणार नाहीस. एकतर रियान पराग संघात येईल किंवा दुसरा कोणीतरी येईल.''अभिषेक नायर पुढे म्हणाला, ''टीम इंडियाचे निवडकर्ते त्याच्याकडे टी–२० फॉरमॅटमधील खेळाडू म्हणून पाहत नसतील असं असू शकतं. कदाचित श्रेयस अय्यर इतरांइतका निवडकर्त्यांपैकी कोणाला तरी आवडत नसावा.'' अभिषेक नायर हा गौतम गंभीरचा माजी सहकारी राहिला आहे. तो चॅम्पियन्स ट्रॉफीपर्यंत टीम इंडियाचा सहाय्यक प्रशिक्षकही होता. त्यामुळे त्याच्या अनुभवाववरून त्याने हे विधान केलं असल्याची शक्यता चाहते वर्तवत आहेत.श्रेयस अय्यर गेल्या दोन वर्षांपासून चांगली कामगिरी करत आहे पण तरीही, हा खेळाडू फक्त एकदिवसीय फॉरमॅटमध्ये खेळत आहे. अय्यरने भारतासाठी टी–२० आंतरराष्ट्रीय सामना ३ डिसेंबर २०२३ रोजी खेळला होता आणि त्यानंतर त्याची संघात निवड झालेली नाही. अय्यरने भारतासाठी ४७ टी–२० डावांमध्ये ११०४ धावा केल्या आहेत, ज्यामध्ये ८ अर्धशतकं केली आहेत.



जर्मनीतील एसेन येथे जर्मन कप फुटबॉल सामन्यात भाग घेताना रॉट–वेइस एसेन आणि बोरुसिया डॉर्टमुंडचे खेळाडू.

# प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांना ''भ. की. सबनीस राज्यस्तरीय सद्भावना पुरस्कार'' जाहीर झाल्याबद्दल सत्कार



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर येथील प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांना अंबाजोगाई येथील ''भ. की. सबनीस राज्यस्तरीय सद्भावना पुरस्कार'' जाहीर झाल्याबद्दल आज बुधवारी २० ऑगस्ट रोजी सत्कार करण्यात आला. हा सत्कार राष्ट्र सेवा दलाचे लातूर जिल्हाध्यक्ष पांडुरंग देडे, मराठवाडा जनता विकास परिषदेचे अभ्यासगट प्रमुख प्राचार्य डॉ. श्रीकांत गायकवाड, पत्रकार तथा राष्ट्र सेवा दलाचे माजी पूर्णवेळ कार्यकर्ते शिवाजी कांबळे, प्रा. कल्याण कांबळे, ज्येष्ठ संपादक अशोक चिंचोले आदींनी प्राचार्य नागोराव कुंभार यांचा शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

यावेळी प्राचार्य कुंभार यांनी संपादक अशोक चिंचोले यांचा त्यांच्या ध्येयवादी पत्रकारितेबद्दल सत्कार केला. याप्रसंगी सत्काराला उत्तर देताना प्राचार्य कुंभार म्हणाले, ''हा पुरस्कार केवळ माझा सन्मान नसून, माझ्या सामाजिक चळवळीतील कार्यकर्त्यांचा आणि सहकाऱ्यांचा सन्मान आहे.मी नेहमीच लोकशाही, समाजवाद आणि धर्मनिरपेक्षता या संविधानिक मूल्यांवर विश्वास ठेवला आहे. सामाजिक सलोखा, समतेचा विचार आणि मूल्याधिष्ठित शिक्षण या विचार दृष्टिकोनावर आधारित सक्रिय राहणे महत्त्वाचे ठरते. सद्भावना ही केवळ शब्द नसून ती एक जीवनशैली आहे, जी प्रत्येक व्यक्तीने अंगीकारली पाहिजे. या पुरस्कारामुळे माझ्यावर अधिक जबाबदारी वाढली असून, भविष्यातही मी समाजातील एकोपा, बंधुता आणि सकारात्मकतेसाठी कार्यरत राहीन.''

# लातूर जिल्ह्यात चोवीस तासांत सरासरी २.१ मिलीमीटर पावसाची नोंद

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यात २० ऑगस्ट रोजी सकाळी आठ वाजता संपलेल्या चोवीस तासांत सरासरी २.१ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. यामध्ये शिरूर अनंतपाळ तालुक्यात सर्वाधिक ४.६ मिलीमीटर, तर उदगीर तालुक्यात सर्वात कमी ०.५ मिलीमीटर पाऊस झाला आहे.

तालुकानिहाय पावसाची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे- लातूर- १.६, औसा- ३.४, अहमदपूर- १.२, निलंगा- ४.२, उदगीर- ०.५, चाकूर- १.०, रेणापूर- ०.६, देवणी- १.४, शिरूर अनंतपाळ- ४.६ आणि जळकोट- १.२ मिलीमीटर.

# खड्ड्यातील रस्त्यांसाठी टोल का द्यायचा? हायकोर्टाच्या निर्णयाला आव्हान देणारी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाची अपील सुप्रीम कोर्टाने फेटाळली!

**मुंबई/प्रतिनिधी :** केरळमधील त्रिशूर जिल्ह्यातील पलियाक्कारा टोल नाक्यावरील टोल वसुली स्थगित करण्याच्या केरळ उच्च न्यायालयाच्या आदेशाला आव्हान देणारी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचएआय) ची अपील सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली. राष्ट्रीय महामार्ग ५४४ च्या एडापल्ली-मनुथी भागाच्या खराब स्थितीबाबत हा आदेश देण्यात आला. मुख्य न्यायमूर्ती बीआर गवई आणि न्यायमूर्ती के विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने सोमवारी हा खटला राखून ठेवला होता. मंगळवारी निकाल देताना, दोन्ही अपील फेटाळण्यात आल्याचे खंडपीठाने सांगितले. सुनावणीदरम्यान, रस्त्याच्या भयानक अवस्थेबद्दल खंडपीठाने एनएचएआयवर सडकून टीका केली, ज्यामुळे अलीकडेच १२ तास वाहतूक कोंडी झाली होती.

तर १५० रुपये का द्यावे?

''एखाद्या व्यक्तीला रस्त्याच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जाण्यासाठी १२ तास लागतात तर १५०रुपये का द्यावे? ज्या रस्त्याला एक तास लागण्याची अपेक्षा आहे, त्याला आणखी ११ तास लागतात आणि त्यांना टोलही भरावा लागतो!'' असे सरन्यायाधीश गवई यांनी म्हटले आहे. न्यायमूर्ती विनोद चंद्रन यांनी या मार्गावरील वाहतूक कोंडीच्या माध्यमांच्या वृत्तांचा संदर्भ दिला आणि सांगितले की दोन्ही न्यायमूर्तींनी वैयक्तिकरित्या या मार्गावर कोंडीचा अनुभव घेतला आहे, असे लाईव्ह लॉ च्या वृत्तात म्हटले आहे. गवई यांनी टिप्पणी केली की राष्ट्रीय महामार्गांवरील गटारे, खड्डे आणि वारंवार होणारी वाहतूक कोंडी ही अकार्यक्षमतेची चिन्हे आहेत.

अडथळा निर्माण झाल्यास शुल्क वसूल करता येत नाही

६ ऑगस्ट रोजी, उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने टोल वसुली चार आठवड्यांसाठी स्थगित केली होती. खराब देखभालीमुळे आणि कामांना विलंब झाल्यामुळे होणारी दीर्घकाळची कोंडी यामुळे महामार्गावर प्रवेश अडथळा निर्माण झाल्यास शुल्क वसूल करता येत नाही, असे निरीक्षण नोंदवले होते. उच्च न्यायालयाने असे नमूद केले होते की नागरिकांना टोल शुल्क भरावे लागत असल्याने, सुरळीत आणि सुरक्षित प्रवास सुनिश्चित करण्याची जबाबदारी एनएचएआयची आहे, तसेच प्राधिकरणाच्या अपयशामुळे जनतेचा विश्वास भंग होतो आणि टोल मागण्याचा अधिकार रद्द होतो. केरळ उच्च न्यायालयाच्या आदेशाला आव्हान देणारी एनएचएआय आणि इतर अधिकाऱ्यांनी केलेली अपील फेटाळण्यात आली.

# गणेशोत्सव, ईद-ए-मिलाद शांततेत साजरे करून सामाजिक एकोपा जपूया ! - जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

## शांतता समितीच्या बैठकीत विविध विषयांवर चर्चा

**लातूर/प्रतिनिधी :** आपल्या जिल्ह्याची शांतताप्रिय जिल्हा अशी ओळख आहे. सर्वधर्मीय सण, उत्सव आतापर्यंत उत्साहाने आणि सामाजिक सलोखा जपत साजरे झाले आहेत. हीच वैभवशाली परंपरा कायम ठेवत यंदाचा पोळा, गणेशोत्सव आणि ईद-ए-मिलाद शांततामय व उत्साहपूर्ण वातावरणात साजरे करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले. दयानंद सभागृहात आयोजित शांतता समितीच्या बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी पोलीस प्रशासनातर्फे 'माझं लातूर, सुरक्षित लातूर' हा अभिनव उपक्रम राबवला जाणार असून, यात जास्तीत जास्त गणेशोत्सव मंडळांनी सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.






या बैठकीस जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, लातूर महानगरपालिका आयुक्त मानसी, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांचे पदाधिकारी आणि मुस्लिम बांधव उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे म्हणाल्या, गणेशोत्सवात ऑपरेशन सिंदूर, स्वदेशी आदी विषयांवर देखावे सादर करावेत. नाविन्यपूर्ण संकल्पना राबवून पर्यावरण संवर्धनाचा संदेश द्यावा. सर्वधर्मीयांनी एकत्र येऊन सामाजिक विश्वास दृढ करावा. गतवर्षी लातूरच्या गणेशोत्सव मंडळाला राज्यस्तरीय तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले होते. यंदा प्रथम क्रमांक मिळवण्यासाठी सामाजिक संदेश देणारे उत्कृष्ट देखावे सादर करावेत. डॉल्बीमुक्त गणेशोत्सवासाठी सहकार्य करण्याचे आणि पारंपारिक वाद्यांचा वापर करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. गणेशोत्सव आणि ईद-ए-मिलाद साजरे करताना सर्वांनी नियमांचे काटेकोर पालन करावे आणि पर्यावरणपूरक उत्सव साजरे करावेत, असेही त्या म्हणाल्या. जिल्हा प्रशासन उत्सवकाळात आवश्यक सुविधा उपलब्ध करेल, असे त्यांनी आश्वासित केले.

### पोलीस प्रशासन राबविणार 'माझं लातूर, सुरक्षित लातूर' उपक्रम

जिल्ह्यातील वृक्ष लागवड चळवळीला गती देण्यासाठी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी सुरु केलेल्या 'माझं लातूर, हरित लातूर' उपक्रमाच्या धर्तीवर जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी 'माझं लातूर, सुरक्षित लातूर' हा उपक्रम जाहीर केला. प्रत्येक गणेशोत्सव मंडळाने आपल्या मंडपात किमान चार सीसीटीव्ही कॅमेरे लावावेत, असे आवाहन त्यांनी केले. उत्सव संपल्यानंतर हे कॅमेरे परिसरातील चौकात लावावेत आणि पुढील उत्सवात पुन्हा मंडपात वापरावेत. यामुळे लातूर शहरात ५ हजारपेक्षा जास्त कॅमेरे लागतील, ज्यामुळे सुरक्षेला बळ मिळेल. डॉल्बीवरील खर्च टाळून मंडळांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. तांबे म्हणाले. जास्त कॅमेरे लावणाऱ्या मंडळांचा तालुका, उपविभाग आणि जिल्हास्तरावर सन्मान केला जाईल, असे त्यांनी सांगितले.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार आवाजाच्या मर्यादेचे पालन करावे. डॉल्बी लावण्यास परवानगी नसून, मर्यादा ओलांडल्यास कठोर कारवाई होईल, असे जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. तांबे यांनी स्पष्ट केले. मुस्लिम बांधवांनी ईद-ए-मिलादची मिरवणूक गणेशोत्सवानंतर काढण्याचा निर्णय घेतल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. तसेच, सर्वधर्मीयांनी सण-उत्सव शांततेत आणि नियम पाळून साजरे करावेत, असे आवाहन केले. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी एक मंडळ, एक अंमलदार संकल्पनेतून प्रत्येक मंडळासाठी समन्वयक अंमलदार नेमला जाईल, असे त्यांनी सांगितले.

### ग्रामीण भागात 'एक गाव-एक गणपती' संकल्पना

ग्रामीण भागात 'एक गाव-एक गणपती' संकल्पना राबवली जाईल. ग्रामपंचायतीमार्फत मंडळांना आवश्यक सुविधा पुरवल्या जातील. कायदा व सुव्यवस्थेसाठी पोलीस प्रशासन आणि ग्रामपंचायतींमध्ये समन्वय राहील, असे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना यांनी सांगितले.

### गणेशोत्सव मंडळांना अधिकाधिक सुविधा देण्यासाठी महानगरपालिका प्रयत्नशील

लातूर शहरातील गणेशोत्सव मंडळांनी मांडलेल्या अडचणींची नोंद घेण्यात आली आहे. याबाबत गुरुवारी बैठक घेऊन तातडीने कार्यवाही केली जाईल. मंडळांना जास्तीत जास्त सुविधा देऊन उत्सव उत्साहात साजरा होईल, यासाठी महानगरपालिका प्रयत्नशील आहे, असे आयुक्त श्रीमती मानसी यांनी सांगितले.

सर्वोच्च न्यायालयाच्या २०१० च्या मंडप उभारणीविषयक आदेशांचे पालन करण्याचे आवाहन उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे यांनी केले. अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांनीही आपले विचार मांडले. बैठकीत गणेशोत्सव मंडळांचे पदाधिकारी आणि मुस्लिम बांधवांनी सूचना मांडल्या. उदगीरचे उपविभागीय अधिकारी गजानन भातलवंडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# युवा गर्जना संमेलनात अभाविप महानगर कार्यकारिणी जाहीर

**लातूर/प्रतिनिधी :** अखिल भारतीय विद्यार्थी परिषद लातूर महानगरच्या नेतृत्वाची घोषणा करण्यात आली असून, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी प्रा. डॉ. प्रसाद कदम यांची पुनर्निवड अध्यक्षपदी तर कु. निशिगंधा बेंबळे यांची नवनियुक्त मंत्रीपदी निवड करण्यात आली आहे.

'युवा गर्जना' या भव्य विद्यार्थी संमेलनात निर्वाचन अधिकारी श्री जितेंद्र जोशी यांनी या निवडीची अधिकृत घोषणा केली. जाहीरनाम्यानुसार या जबाबदाऱ्यांचा कार्यकाळ एक वर्षांचा राहणार आहे. त्याचबरोबर उर्वरित लातूर महानगर कार्यकारिणीची देखील घोषणा करण्यात आली.

या प्रसंगी अभाविपचे प्रदेश संघटन मंत्री श्री सिद्धेश्वर लटपटे उपस्थित होते. संमेलनादरम्यान निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांचे कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त स्वागत केले.




# गणेश मंडळाना मोफत मिळणार प्रत्येकी ५१ वृक्ष रोपे !

## २५ ऑगस्ट पर्यंत नाव नोंदणी आवश्यक; ''वसुंधरा'' वृक्षरुपी गणेश मंडळाचा उपक्रम

**लातूर/प्रतिनिधी :**लातूरचे वनक्षेत्र वाढावे यासाठी वसुंधरा प्रतिष्ठान संचलित वसुंधरा वृक्षरूपी गणेश मंडळाच्या वतीने प्रत्येक गणेश मंडळाना ५१ वृक्ष रोपे मोफत उपलब्ध करून दिली जाणार आहेत. ज्या गणेश मंडळाकडे वृक्ष लागवड करण्यासाठी जागा उपलब्ध आहे, त्यांनी २५ ऑगस्ट पर्यंत नावनोंदणी करणे आवश्यक आहे. लावलेल्या झाडांचे संवर्धन करण्याची हमी गणेश मंडळानी घ्यावी आणि हा गणेशोत्सव वृक्ष उत्सव म्हणून साजरा व्हावा यासाठी हा उपक्रम घेतला जातो आहे.


वसुंधरा प्रतिष्ठान संचलित वसुंधरा वृक्षरूपी गणेश मंडळाच्या वतीने सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. अवयव दान, रक्तदान शिबीर, आरोग्य शिबीर, महिलांसाठी पैठणी स्पर्धा, विविध क्रीडा स्पर्धा, गडकिल्ले संवर्धन, स्वच्छता अभियान आदी उपक्रम वर्षभर आयोजित केले जातात. याशिवाय, पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज ओळखून दरवर्षी लातुरात झाडाचा गणपती साकारला जातो. सोबतच लातूर शहरातील आणि आजूबाजूच्या गावातील इतर गणेश मंडळाना सोबत घेऊन वृक्ष चळवळ उभी केली जाते. २०१६ साली एक गणेश मंडळ : एक वृक्ष या अभियानापासून यावर्षी प्रत्येक गणेश मंडळाला ५१ रोपं मोफत उपलब्ध करून दिली जाणार आहेत. गणेश मंडळानी गणपती बाप्पांच्या नावाने वृक्षांचे संवर्धन करावे एवढी एकच अट गणेश मंडळाना घालून देण्यात आली आहे. लातूर शहरातील आणि आजूबाजूच्या गावातील ज्या गणेश मंडळाकडे वृक्ष लागवड करण्यासाठी जागा उपलब्ध आहे, अशा गणेश मंडळानी राहुल माशाळकर (८८८८८८४०२०) यांच्याशी २५ ऑगस्ट २०२५ पर्यंत संपर्क साधावा असे आवाहन वसुंधरा वृक्षरूपी गणेश मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

### ''हरित लातूर'' साठी गणेश मंडळानी एकत्र येण्याची गरज

लातूर जिल्हा हरित होण्यासाठी सर्वांनी पुढाकार घेण्याची गरज आहे. गणेश उत्सव काळात मोठ्या प्रमाणावर विविध उपक्रम राबविले जातात. सार्वजनिक गणेश मंडळानी या गणेशोत्सव काळात वृक्ष लागवड आणि संवर्धन मोहीम हाती घेण्याची गरज आहे. प्रत्येक गणेश मंडळानी यासाठी पुढाकार घेतल्यास मोठ्या प्रमाणावर वनक्षेत्र वाढण्यास मदत होणार आहे. लोकमान्य टिळक यांनी गणेश उत्सवाच्या माध्यमातून सर्व जाती धर्मातील लोकांना एकत्र आणले, आता सर्वांनी एकत्रित येऊन लातूरला हरित करण्यासाठी प्रयत्न करूया, असे आवाहन करण्यात येत आहे.

### वसुंधरा कडून खड्डे करण्यासाठी लागणारी मशीन मोफत उपलब्ध

वृक्ष लागवड करण्यासाठी खड्डे करणारी मशीन वसुंधरा वृक्षरूपी गणेश मंडळाच्या वतीने मोफत उपलब्ध करून दिली जाणार आहे. लातूरचे वनक्षेत्र वाढावे आणि यासाठी या गणेशोत्सव कालावधीत ही चळवळ लोकचळवळ व्हावी याकरिता या मंडळाने ही मशीन मोफत उपलब्ध करून देण्याचा निर्णय केला आहे. ज्या मंडळाकडे वृक्षारोपण करण्यासाठी जागा उपलब्ध आहे व जे गणेश मंडळ गणपती बाप्पांच्या नावाने झाडांचे संवर्धन करण्यासाठी पुढाकार घेऊ इच्छितात त्यांनी संपर्क साधण्याचे आवाहन या मंडळाने केले आहे.



# भांडूपमध्ये रस्त्यात करंट पसरला, लोकांनी हाका मारल्या पण मुलाच्या कानात हेडफफोन, वीजेचा झटका बसून मुलाचा मृत्यू

**मुंबई/प्रतिनिधी :** भांडूपमध्ये रस्त्यावरती खुले असलेल्या विजेच्या तारांमुळे एका तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. हा प्रकार भांडूपच्या पन्नालाल कंपाऊंड परिसरात घडला. मृत्यू झालेल्याचे नाव दीपक पिल्ले असून तो फक्त १७ वर्षांचा होता. मिळालेल्या माहितीनुसार, दीपक एल. बी. एस. मार्गावरून आपल्या घरच्या दिशेने जात होता. त्याने कानात हेडफफोन घातले होते, त्यामुळे परिसरातील नागरिकांनी केलेले इशारे त्याला ऐकू आले नाहीत. रस्त्यावर महावितरणाची हाय टेन्शन वायर खुली होती, आणि त्याच्याशी संपर्कात येताच विजेचा जोरदार शॉक लागला. त्याचा जागीच मृत्यू झाला. प्रत्यक्षदर्शी दिनेश जैन यांनी दिलेल्या माहितीनुसार, ''रस्त्यातून अनेक लोक जात होते, आम्ही त्यांना सावध करण्याचा प्रयत्न केला. दीपककडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला, पण कानात हेडफफोन असल्यामुळे तो ऐकू शकला नाही. आम्ही मागे धावत गेले, पण तो आधीच वायरच्या संपर्कात आला होता आणि खाली पडला,'' असे त्यांनी सांगितले. या घटनेवेळी परिसरातील नागरिकांनी सतर्कतेचे इशारे दिल्यामुळे अनेक लोकांचे प्राण वाचले. परंतु, दीपक या दुर्दैवी घटनेत अडकला. या प्रकाराने स्थानिकांमध्ये चिंता निर्माण झाली असून, नागरिकांनी आणि प्रशासनाने अशा ठिकाणी त्वरित सुरक्षा उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# पंधरावे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, हिंगणघाट जि. वर्धा येथे राज्यस्तरीय पुरस्कारासाठी आवाहन

कळंब (प्रतिनिधी)- मराठी साहित्य मंडळ या प्रख्यात संस्थेतर्फे वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट शहरामध्ये रविवार दिनांक १२ ऑक्टोबर २०२५ रोजी पंधरावे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट शहरांमध्ये आयोजित* *केले आहे, त्या निमित्ताने राज्यस्तरीय पुरस्कारा साठी आवाहन* *केले आहे, त्यामध्ये साहित्य भूषण, विद्या भूषण, कला भूषण, समाजभूषण, पत्रकार* *भूषण तसेच वैद्यक भूषण आदी पुरस्काराने मान्यवरांना गौरविण्यात येणार आहे, तरी प्रज्ञावंतानी* *तसेच इच्छुक व्यक्तींनी आपले प्रस्ताव १० सप्टेंबर २०२५ पर्यंत संस्थेच्या *मुख्य कार्यालयात पाठवावे.

*नियम व शर्ती खालील प्रमाण- १) प्रस्ताव मुख्य कार्यालयामध्ये १० सप्टेंबर २०२५ पर्यंत पोहोचले पाहिजेत*, *त्यानंतर येणाऱ्या प्रस्तावांचा स्वीकार केला जाणार नाही*

२) प्रस्तावा सोबत दोन पानी परिचय पत्र पाठवावे, त्यावर* *संपूर्ण पता आणि व्हॉटसअप नंबर लिहिण्यास विसरू नये*

३) प्रस्तावासोबत पुस्तकांच्या दोन प्रती पाठवाव्यात-

४) पुस्तकाचे प्रकाशन कोणत्याही साली झाले असले* *तरी चालेल , मात्र ते प्रथम आवृत्तीचे असावे.

५) प्रस्ताव नामंजूर झाल्यास कोणत्याही सबबीवर पुस्तके* *परत पाठवली जाणार नाहीत*

६) निवड समितीचां निर्णय अंतिम राहील.

७)साहित्य भूषण पुरस्कार वगळता उर्वरित पुरस्कारांसाठी.पुस्तके पाठविण्याची अट नाही मात्र त्यांनी आपल्या कार्याचा फक्त दोन पानी अहवाल पाठवावा लागेल.

८) निवड समितीने आपला प्रस्ताव मंजूर केल्यास आपणास आजीव सभासद व्हावे लागेल* कारण पुरस्कार हा आमच्या आजीव सभासदांना दर्जा पाहून दिला जातो.

९ ) प्रस्ताव पोस्टाने पाठवू नयेत, कारण एक तर तो उशिरा मिळतो किंवा वेळेत मिळतच* *नाही प्रस्ताव कुरिअरनेच पाठवावेत*

*प्रस्ताव पाठविण्याचा पत्ता*
*मुख्य कार्यालय*
*मराठी साहित्य मंडळ*
*निळकंठ बिल्डिंग , पहिला मजला*,
*बबल दुकानावर, गाडगीळ ज्वेलर्स* *समोर, राम मारुती रोड, नौपाडा*,*ठाणे पश्चिम ४०० ६०२

डॉ . घुमटकर यांनी केले आहे .

# नागरिकांच्या आंदोलनाला यश; सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावर अंडरपासच्या कामास सुरुवात - सोमनाथ गुरव यांची माहिती



धाराशिव (प्रतिनिधी)- सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावर पथदिवे, अंडरपास आणि सर्विस रोडची मागणी नागरिकांकडून गेल्या अनेक वर्षांपासून होत होती. या मार्गावर वाढत्या वाहतुकीमुळे अपघातांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत होते. अखेर सातत्यपूर्ण पाठपुराव्यास यश आले असून प्रत्यक्षात काम सुरु झाले आहे. केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी, खासदार ओमराजे निंबाळकर, कैलास पाटील, मकरंद राजेंनिंबाळकर यांचे नागरिकांतून आभार व्यक्त होत असल्याच ठाकरे पक्षाचे शहरप्रमुख सोमनाथ गुरव यांनी म्हटले आहे.

राष्ट्रीय महामार्ग होऊनही अनेक कामे झालेली नव्हती. त्यामुळे जनतेला वाहतुकीची मोठी समस्या निर्माण झाली होती. या मागणीनुसार खासदार ओमराजे निंबाळकर यांनी लोकसभेच्या अधिवेशनात, दिशा समितीच्या बैठकीत त्यांनी अनेकदा या प्रश्नाकडे लक्ष वेधले. केंद्रीय रस्ते विकासमंत्री नितीन गडकरी यांच्याकडे हा प्रश्न सोडविण्यासाठी वारंवार भेटी घेतल्या. तसेच आमदार कैलास पाटील यांनीही याबाबत सर्व पातळीवर पाठपुरावा केला. माजी नगराध्यक्ष मकरंद राजेनिंबाळकर यांनी हा प्रश्न लावून धरला होता. याचबरोबर नागरिकांनीही वेगवेगळ्या प्रकारे आंदोलन करून या कामाची गरज दाखवून दिली. अखेर लोकप्रतिनिधींचे प्रयत्न आणि नागरिकांच्या आंदोलनानंतर या सर्व कामाना मंजुरी मिळाली पण कामे काही होत नव्हती. वाढते अपघात पाहता पुन्हा हे काम होण्यासाठी प्रयत्न करावे लागले. सर्विस रोड, पथदिवे व अंडरपास आदी कामे न झाल्याने काही महिन्यांपूर्वी अपघातात एका शाळकरी मुलाचा मृत्यू झाला. तेव्हा नागरिकांतून तीव्र संताप व्यक्त झाला त्यांनी मोठं आंदोलन करून प्रशासनावर दबाव वाढविला. शिवाय लोकसभेच्या अधिवेशनात खासदार ओमराजे यांनी व आमदार कैलास पाटील यांनीही विधानसभेच्या अधिवेशनात हा मुद्दा उपस्थित केला. साहजिक तेव्हापासून त्या अनुषंगाने कामे हाती घेतली गेली आता अंडरपासच्या कामास प्रत्यक्ष सुरवात झाली आहे. सध्या मार्गावर सर्विस रोड व पथदिवे बसविण्यात आले असून अंडरपासच्या कामालाही सुरुवात झाल्याने नागरिकांतुन समाधान व्यक्त होत आहे.जुना उपळा रोड या ठिकाणी अंडरपास ची मागणी प्रस्तावित असून त्यासाठीही पाठपुरावा सुरु असल्याची माहिती सोमनाथ गुरव यांनी दिली आहे. नागरिकांच्यावतीने केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, खासदार ओमराजे निंबाळकर, आमदार कैलास पाटील व माजी नगराध्यक्ष मकरंद राजेनिंबाळकर यांचे आभार सोमनाथ गुरव यांनी व्यक्त केले आहेत.

# संत सेना महाराजांच्या अभंगगजरात कळंब शहर दुमदुमले: युवापिढीने संतांच्या विचारांचा वारसा पुढे न्यावा - ह.भ.प. अण्णासाहेब बोधले



कळंब(प्रतिनिधी)-नाभिक समाजाचे आराध्य दैवत संत सेना महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त कळंब शहर भक्तिरसात न्हाऊन निघाले. महाराष्ट्र नाभिक महामंडळाच्या वतीने आयोजित या सोहळ्यात आम्ही वारीक, वारीक हजामत करू बारीक या अभंगाच्या गजराने वातावरण भारावून गेले. सकाळी शहरातील प्रमुख मार्गावरून पालखी सोहळा आणि दिंडीचे आयोजन करण्यात आले. ह.भ.प. गुरु रामचंद्र बोधले महाराज व ह.भ.प. बलभीम महाराज धाकतोडे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला-पुरुषांसह लहान वारकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले. लहानग्यांच्या गोड भजनांनी आणि महिलांच्या फुगडीने सोहळ्याला रंगत आली. यानंतर ह.भ.प. अण्णासाहेब बोधले महाराज यांचे गुलालाचे कीर्तन पार पडले. अभंगांच्या ओघात त्यांनी युवापिढीला संदेश दिला की, संत सेना महाराजांसारखे आचरण करणे हीच खरी आपली गुरुदक्षिणा आहे.

दुपारी बारा वाजता संतांच्या मूर्तीवर गुलाल पुष्पवृष्टी करून अभिवादन करण्यात आले. मंदिर परिसरात डॉ. भागवत राऊत यांच्या नेतृत्वाखाली भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन झाले. राहुल देवळकर यांच्या वतीने मोफत औषधोपचाराची सोय उपलब्ध करून देण्यात आली होती. शेकडो बांधवांनी शिबिराचा लाभ घेतला.

यानंतर ज्ञानेश्वर जगन्नाथ पंडित यांच्या पुढाकाराने महाप्रसादाचे आयोजन झाले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विष्णू मंडाळे, बापुराव सुरवसे, सतीश गोरे, राजे सावंत, प्रमोद करवलकर, युवराज पंडित, ओंकार मंडाळे, सूरज मंडाळे, आबासाहेब मंडाळे, रणजित शेंद्रे, महेश काळे, गोकुळ मंडाळे, मुन्ना काळे, विनायक माने, अमोल सुरवसे, योगेश करवलकर, सिद्धेश्वर डिगे, श्रीकृष्ण अंबुरे, शशिकांत गायकवाड, महादेव धाकतोडे, महेश सुरवसे, हरी मंडळ, रामेश्वर पौळ, अक्षय मंडाळे, अशोक मंडाळे, लिंबराज देवकर आदींनी परिश्रम घेतले.

# मागासवर्गीय सेवानिवृत्त कर्मचारी संघाची बैठक संपन्न



धाराशिव (प्रतिनिधी)- येथे दिनांक १६ ८ २०२५ रोजी मागासवर्गीय सेवानिवृत्त कर्मचारी संघाच्या धाराशिव शाखेची बैठक धाराशिव येथे संपन्न झाली या बैठकीच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अरुणभाऊ बनसोडे हे होते यावेळी सामाजिक व कर्मचाऱ्यांच्या विविध समस्यांच्यावरती ,प्रश्नावरती चर्चा करण्यात आली यावेळी विजय गायकवाड यांनी संघटनेची भूमिका विशद करून शासनाने कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना त्वरित लागू करावी कर्मचाऱ्यांचे थकीत बिले त्वरित देण्यात यावेत अशा व इतर मागण्यांचे निवेदन शासनाकडे पाठवणार असल्याचे सांगितले या बैठकीस राजाभाऊ बनसोडे, नितीन सोनवणे, यु व्ही माने , पांडुरंग सवाई, सुनील बनसोडे ,प्रभाकर बनसोडे, अशोक बनसोडे ,प्रदीप शिंदे, बाळासाहेब माने, राजेंद्र धावारे, इत्यादींची उपस्थिती होती कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रभाकर बनसोडे यांनी केले कार्यक्रमाचे आभार सुनील बनसोडे यांनी मानले

# अँटी-रॅगिंग,सायबर गुन्हेगारी आणि महिला सुरक्षा या विषयावर एक दिवशीय कार्यशाळा



कळंब(प्रतिनिधी)- शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय,कळंब येथे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आणि अँटी रॅगिंग समिती यांच्या संयुक्त विद्यमाने रॅगिंगला प्रतिबंध करण्याच्या उद्देशाने आठवडाभर अँटी रॅगिंग सप्ताह राबवण्यात आला . या अंतर्गत १२ ते १८ ऑगस्टदरम्यान महाविद्यालयात विविध उपक्रम राबवले गेले .दिनांक २० ऑगस्ट रोजी अँटी-रॅगिंग,सायबर गुन्हेगारी (ढूलशी लीळाश) आणि महिला सुरक्षा या विषयावर एक दिवशीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली ,याप्रसंगी प्रथम सत्रात ॲड. एस. आर.आगलावे यांनी रॅगिंगविरोधी कायद्यांची माहिती आणि तक्रार निवारण प्रक्रिया ,रॅगिंगचे दुष्परिणाम आणि त्यावर मात करण्यासाठी उपाययोजनांची माहिती दिली ,दुसऱ्या सत्रात प्रभा पुडंगे सहा.पोलिस उपनिरीक्षक ,कळंब यांनी सायबर गुन्हेगारीचे प्रकार, महिलांवरील परिणाम,कायदेशीर उपाय,महिलांसाठी सुरक्षा,जागरूकता,याबदल मार्गदर्शन केले,या कार्यशाळेचे आयोजन. अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक प्रा.अर्चना मुखेडकर, अँटी रॅगिंग समिती सदस्यडॉ.दत्ता साकोळे, डॉ.मीनाक्षी जाधव डॉ.विश्वजीत म्हस्के, यांनी केले तसेच कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. गुंडरे , डॉ.अंकुशराव , एनसीसी ऑफिसर बोंदर मॅडम यांनी केले , याप्रसंगी अँटी रॅगिंग समितीचे चेअरमन तसेच संस्थेचे संचालक डॉ. संजय कांबळे नवागत विद्यार्थ्यांना सुरक्षित महाविद्यालयीन जीवनाची हमी दिली.कार्यशाळेचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भगवान सर यांनी या रॅगिंगविरोधी जागृतीपर कार्यशाळेत सर्वअभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना रॅगिंगबाबत सजग करीत महाविद्यालयीन कार्यकाळात महाविद्यालयाच्या प्रशासनाद्वारे पूर्ण सुरक्षितता प्रदान करण्याची हमी देण्यात आली.

तसेच मान्यवरांच्या हस्ते विविध स्पर्धेमध्ये भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले त्यामध्ये निबंध स्पर्धा,स्लोगन, लोगो, भाषण, पोस्टर प्रेझेंटेशन, पथनाट्य स्पर्धा इत्यादी स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.या स्पर्धेमध्ये १०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.विजेत्यांची नाव डॉ.जाधव यांनी जाहीर केले.या कार्यशाळेचे प्रथम सत्राचे सूत्रसंचालन डॉ. साकोळे,आभार. डॉ.म्हस्के यांनी केले.यावेळी डॉ. दीपक सूर्यवंशी,डॉ. राठोड, डॉ.भोसले,डॉ. सावंत, प्रा. दळवी,डॉ. सरवदे , डॉ.लोहकरे ,डॉ. चांदोरे ,प्रा.बालाजी राऊत,श्री.अरविंद शिंदे,प्रा.गोविंद फेरे , प्रा.बाळासाहेब बाबर , प्रा.संदीप देवकते .प्रा. प्रताप शिंदे,प्रा.अर्चना पाटील, प्रा .ज्योती टीपरसे, प्रा.प्रणिता खोसे,कार्यक्रमासाठी वरिष्ठ कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि २०० विद्यार्थी उपस्थित होते.ही कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी अधीक्षक हनुमंत जाधव , इकबाल शेख जया पांचाळ,संदीप सूर्यवंशी यांनी सहकार्य केले.


## लातूर समाचार उस्मानाबाद
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708


## उस्मानाबाद शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४


## Name of change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **QUAZI SABA FARHEEN MAHEBOOB RAHEMAN**. TO: **SYED SABAFARHEEN FAISAL ALI**
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the **SYED SABAFARHEEN FAISAL ALI** will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **QUAZI SABA FARHEEN MAHEBOOB RAHEMAN.**
NEW NAME :- **SYED SABAFARHEEN FAISAL ALI**
Address -NEAR ABHINAV ENGLISH SCHOOL,SHIRIN COLONY OSMANABAD -413501.
Adhar no.-925668798717
Mob. No.-9921830705

---

## Name of change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **PATHAN RAFIK SHABBIRKHAN.** TO: **RAFIK SHABBIR PATHAN**
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the **RAFIK SHABBIR PATHAN** will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **PATHAN RAFIK SHABBIRKHAN**.
NEW NAME:- RAFIK SHABBIR PATHAN.
Address :- ISLAMPURA AT DIKSAL, POST KALAMB DIST. OSMANABAD -413507.
Adhar no.-541653210813
Mob. No.-7028366253

---

## Name of change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **SHAIKH REHANA AKHEEL.** TO: **REHANA BEGAM AKHIL AHEMAD SHAIKH**
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the **REHANA BEGAM AKHIL AHEMAD SHAIKH** will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **SHAIKH REHANA AKHEEL.**
NEW NAME :- **REHANA BEGAM AKHIL AHEMAD SHAIKH**
Address - SANT SAIBABA HOUSING SOCIETY, BACK SIDE TULJAPUR NAKA, OSMANABAD-413501.
Adhar no.-949327750577
Mob. No.-8484939466


हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar, Osmanabad Printed & Published by Jade Dayanand Shankarrao , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Osmanabad. Editor : Jade Dayanand Shankarrao Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649